CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २६८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### राज्यभरात महायुतीचे ७० नगरसेवक बिनविरोध

**मुंबई :** मनपा निवडणुकीच्या मतदानाआधीच राज्यभरात महायुतीचे तब्बल ७० उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये सर्वाधिक ४४ नगरसेवक भाजपचे आहेत तर शिवसेनेचे २२ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादीनंही २ बिनविरोध नगरसेवकांद्वारे खातं उघडलंय. इस्लामिक पार्टीचा मालेगावमधून एक आणि दुसऱ्या एका ठिकाणी एका अपक्षाचीही बिनविरोध निवड झालीय. निवडणुकीला सामोरं जाताना या बिनविरोध जागा निवडून आल्यानं सत्ताधारी महायुतीचं मनोबल वाढलंय. महापालिका निवडणुकीत एरव्ही हाताच्या बोटावर मोजण्या इतक्याच ठिकाणी बिनविरोध निवडणूक झाल्याची उदाहरणं आहेत.

### पुण्यात राष्ट्रवादीच्या उमेदवारावर पैसे वाटल्याचा आरोप

**पुणे :** महापालिका निवडणुकीत पुण्यात राष्ट्रवादी आणि भाजपात वाद निर्माण होत आहेत. राष्ट्रवादीचे उमेदवार बाबुराव चांदेरेच्या मुलाने पैसे वाटल्याचा आरोप केला जातोय. भाजप उमदेवार गणेश कळमकर यांनी थेट मुख्यमंत्री फडणवीस यांना फोन केला. चांदेरेंविरोधात भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. निवडणूक संपेपर्यंत चांदेरेंच्या मुलांना तडीपार करण्याची मागणी भाजपकडून केली जातेय.

### मंगेश काळोखेंची सुपारी देऊन हत्या

**मुंबई :** खोपोलीतील शिवसेना नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या हत्येप्रकरणी आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली असून मंगेश काळोखे यांची हत्या सुपारी देऊनच करण्यात आल्याचे निष्पन्न झालंय. ज्यांचा या गुन्ह्यात सहभाग आढळून आला आहे. त्यांना रायगड पोलिसांकडून अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे आणि प्रवक्ते भरत भगत यांचा या गुन्ह्यात अद्याप तरी सहभाग आढळून आलेला नाही. मात्र त्याबाबत तपास सुरू असून तो अंतिम टप्प्यात असल्याचं पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी सांगितलं.

### अमेरिकेचे व्हेनेझुएलावर हवाई हल्ले

**नवी दिल्ली :** अमेरिकेने व्हेनेझुएलावर हवाई हल्ला केला आहे. व्हेनेझुएलाच्या कारकास शहरात जोरदार हल्ले करण्यात आले आहेत, ज्यात व्हेनेझुएलाच्या संरक्षण मंत्र्यांच्या घरालाही लक्ष्य करण्यात आलं आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या भूमीवर लष्करी कारवाई केली, आणि यामागे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्यावर दबाव वाढवण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. अमेरिका मादुरो यांना राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा देण्यासाठी सातत्याने दबाव टाकत आहे. याआधी डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट धमकी दिली होती. त्यात आता अमेरिकेच्या लष्करी कारवाईमुळे परिस्थिती आणखी तणावपूर्ण झाली आहे.

### वंचितच्या ४५ उमेदवारांची फायनल यादी

**मुंबई :** प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आाघाडी यंदा मुंबई महानगरपालिकेत काँग्रेसशी युती करुन निवडणूक लढवत आहे. या दोन्ही पक्षांच्या जागावाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार मुंबईत काँग्रेस पक्ष १६७ आणि वंचित ६३ जागांवर निवडणूक लढवणार होता. मात्र, वंचितच्या वाट्याला आलेल्या ६३ जागांपैकी १६ जागांवर वंचित बहुजन आघाडीला उमेदवारच मिळाला नाही. त्यामुळे या १६ जागांवर वंचित आणि काँग्रेस यांच्यापैकी कोणीही उमेदवारी अर्ज भरलेला नाही. तर उमेदवारी अर्जांच्या छाननीत वंचितच्या एका उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला.

# छत्तीसगडमध्ये १४ माओवाद्यांचा खात्मा

**मोस्ट वॉन्टेडसह २० जणांचे आत्मसमर्पण**

**रायपूर :** छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांविरोधात सुरक्षा दलांनी पुकारलेल्या युद्धाला शनिवारी मोठे यश आले. सुकमा आणि विजापूर या दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांत झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी १४ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले आहे. एकीकडे चकमकी सुरू असतानाच दुसरीकडे मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी नेता देवा बरसे याने आपल्या २० सहकाऱ्यांसह शरणागती पत्करल्याने नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

सुकमाच्या किस्ताराम भागात डीआरजी पथकाने शनिवारी सकाळी ८ वाजता मोठी कारवाई केली. या भीषण चकमकीत १२ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा



दलांना यश आले. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि नक्षलवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले आहेत.

विजापूरमध्ये पहाटे ५ वाजल्यापासून सुरक्षा दलांचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली. येथे दोन नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले असून, त्यापैकी एकावर ५ लाख तर दुसऱ्यावर ८ लाख रुपयांचे इनाम होते. पोलीस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी या कारवाईला दुजोरा दिला आहे.

**ओडिशात १ कोटीचा इनाम असलेला कमांडर ठार**

या कारवाईपूर्वी २५ डिसेंबर रोजी ओडिशाच्या कंधमालमध्येही सुरक्षा दलांनी मोठी मोहीम राबवली होती. या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले असून, त्यात केंद्रीय समितीचा सदस्य गणेश उईके याचा समावेश आहे. ६९ वर्षीय उईकेवर सरकारतर्फे १ कोटी रुपयांचे इनाम होते.

या कारवाईत दोन महिला नक्षलवाद्यांचाही खात्मा करण्यात आला. सध्या सुकमा आणि विजापूरच्या घनदाट जंगलात शोध मोहीम अजूनही सुरू आहे. दोन्ही बाजूंकडून अधूनमधून गोळीबार सुरू असून सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या कारवाईमुळे नक्षलवाद्यांचे नेटवर्क खिळखिळे झाले आहे.

### मोस्ट वॉन्टेड 'देवा बरसे'ची शरणागती

माओवाद्यांची देशातील सर्वात लढवयी बटालियन असलेल्या पीपल्स लिबरेशन गोरील्ला आर्मी या बटालियन क्रमांक एकचा कमांडर बारसे देवासह २० माओवाद्यांनी तेलंगणा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. माओवाद्याच्या संघटनेत सर्वाधिक लढवयी क्रूर आणि गनिमी कावा पद्धतीने सुरक्षा दलांना लक्ष करणारी ही बटालियन होती. या बटालियनच्या हल्ल्यात आत्तापर्यंत दंडकरण्यात ३०० पेक्षा जास्त जवान ठार झाले आहेत. बारसे देवा हा महत्त्वाचा कमांडर या बटालियनचा प्रमुख आहे. या बटालियन चा बरीच वर्ष हीडमा प्रमुख होता. गेल्याच वर्षी बारसे देवाकडे हीडमाकडून या बटालियनची जबाबदारी देण्यात आली होती. बारसे देवावर सगळ्या राज्यांचा मिळून तीन कोटीचा बक्षीस आहे. आता तो साथीदारांसह शरण आल्याने मोठं यश आले आहे.

# महाराष्ट्रातील सात खासदार राज्यसभेतून निवृत्त होणार

**मुंबई :** राज्यसभेच्या राजकारणात येत्या काळात मोठ्या घडामोडी पाहायला मिळणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह महाराष्ट्रातील सात राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ पूर्ण होत असून ते निवृत्त होणार आहेत. देशभरात भाजपचे सर्वाधिक ३० खासदार यंदा राज्यसभेतून निवृत्त होत आहेत.

२०२६ हे वर्ष राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरणार असून, या वर्षात देशातील पाच राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. यंदा राज्यसभेतील एकूण ७१ खासदारांचा कार्यकाळ संपत आहे. त्यापैकी मार्च महिन्यात १, एप्रिलमध्ये ३७, जूनमध्ये २२ तर नोव्हेंबरमध्ये ११ खासदार निवृत्त होणार आहेत.

राज्यसभेच्या एकूण २४५ जागांपैकी एप्रिल, जून आणि नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ७३ जागांसाठी निवडणूक होणार आहे. निवृत्त होणाऱ्या खासदारांमध्ये केंद्रीय मंत्र्यांसह अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. त्यातील सर्वात मोठे नाव म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे. त्यांचा कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी संपणार आहे. माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा हेही त्याच कालावधीत राज्यसभेतून निवृत्त होणार आहेत.

महाराष्ट्रातील एकूण सात राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिल २०२६ रोजी संपत आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे सर्वात मोठे नाव आहे.

त्यांच्यासोबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड आणि खासदार धैर्यशील मोहन पाटील यांचाही समावेश आहे. शिवसेना पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या खासदार डॉ. फौजिया खान हे सर्वजण एकाच दिवशी राज्यसभेतून निवृत्त होत आहेत.

### साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णींवर हल्ला

**सातारा :** साताऱ्यामध्ये १ जानेवारी रोजी मराठी साहित्य



संमेलनाला सुरुवात झाली आहे. दरम्यान, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. साहित्य संमेलनाच्या स्थळीच हा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. साताऱ्यात घडलेल्या या घटनेमुळे सर्वांना धक्का बसला आहे. या हल्ल्या मागचा नेमका हेतू काय? या संदर्भात माहिती समोर आलेली नाही. तसेच हल्ला कोणी केला या संदर्भात माहिती समोर आलेली नाही.सातारा येथील शाहू स्टेडियम येथे सुरु असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दीडशेहून अधिक पुस्तकांचे स्टॉल आहेत.

# राज्यातील बिनविरोध निवडणुकांची चौकशी होणार


**▶▶ राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश, विजयी नगरसेवक रडारवर!**

**मुंबई :** महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुकींचे निकाल जाहीर व्हायला १३ दिवस बाकी आहेत. मात्र, या निवडणुकांआधीच राज्यभरात एकूण ६७ उमेदवारांची नगरसेवकपदी बिनविरोध निवड झाली आहे. मात्र मुंबईसह राज्यातील बिनविरोध निवडणुकांची चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. विरोधी उमेदवारांवर दबाव, आमिष किंवा जबरदस्ती करून नामनिर्देशन मागे घेण्यास भाग पाडले गेले का, याची तपासणी करण्यात येणार आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडींची विजय घोषणा केली जाणार नाही, अशी माहितीही राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

केडीएमसीत भाजपचे १४ व शिवसेना शिंदे गटाचे ६ उमेदवार, तसेच पिंपरी-चिंचवड, जळगाव, छत्रपती संभाजीनगर येथे किमान एक भाजपा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. कुलाबातील तीन प्रभागांत काँग्रेस, जनता दल (एस) व आपचे उमेदवारांनी दबावाखाली नामनिर्देशन न स्वीकारल्याचा




आरोप केला असून या प्रकरणाचीही चौकशी होणार आहे. आयोगाने मुंबई महापालिका आयुक्त व वॉर्ड 'ए' कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे निर्देश दिले आहेत. नियमभंग सिद्ध झाल्यास निवडणूक अधिकाऱ्यावर कारवाई होऊ शकते. मात्र उमेदवारांना पुन्हा नामनिर्देशन दाखल करण्याची तरतूद नाही. २ जानेवारी (नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख) नंतर संबंधित परतावा अधिकारी, महापालिका आयुक्त व पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागवले जातील.



**सातारा :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त त्यांचे जन्मगाव असलेल्या खंडाळा तालुक्यातील नायगाव येथील स्मारकास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आमदार अतुल भोसले, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी आदी उपस्थित होते.

### गडचिरोलीत ६ किमीच्या पायपीटीने गरोदर महिलेचा मृत्यू

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आलदंडी टोला येथील आशा संतोष किरंगा या ९ महिन्यांच्या गरोदर मातेला प्रसूतीसाठी तब्बल सहा किलोमीटरची पायपीट करावी लागली. या शारीरिक त्रासामुळे उद्भवलेल्या गुंतागुंतीत आधी पोटातील बाळ दगावले आणि काही वेळातच मातेनेही अखेरचा श्वास घेतल्याची दुर्दैवी घटना समोर आल्यानंतर सर्वत्र तीव्र संताप व्यक्त होत आहे.




# न्यायालयाच्या आदेशानंतरही मशाल चिन्ह न दिल्याने वाद

## निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात अंबादास दानवे यांनी विचारला जाब

**तभा वृत्तसेवा,**
**संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग



क्रमांक ०४ मधील अनुसूचित जाती प्रवर्गातील शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत उमेदवार सावित्रीबाई हिरालाल वाणी यांना उच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश असतानाही मशाल हे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्यात आले नाही. या गंभीर प्रकाराविरोधात महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते व शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी थेट निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.

उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे हे निवडणूक यंत्रणेचे घटनात्मक कर्तव्य असताना, जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. मशाल चिन्ह न मिळाल्यामुळे उमेदवाराच्या प्रचार प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असून हा प्रकार लोकशाही मूल्यांवर तसेच न्यायालयाच्या आदेशावर गंभीर आघात करणारा असल्याचे दानवे यांनी स्पष्ट केले.

**राज्य मुख्य निवडणूक आयुक्त व मनपा आयुक्तांशी थेट संवाद**

या प्रकरणाची दखल घेत अंबादास दानवे यांनी राज्य मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे तसेच मनपा आयुक्त तथा महानगरपालिका निवडणूक अधिकारी यांच्याशी थेट फोनवरून संवाद साधला. उच्च न्यायालयाचा आदेश असूनही उमेदवाराला चिन्ह न दिले जाणे हे अत्यंत गंभीर असून तात्काळ आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी ठाम मागणी त्यांनी यावेळी केली.

उच्च न्यायालयाचा आदेश डावलण्याचा अधिकार कोणालाही नाही. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि कायद्याच्या चौकटीतच पार पडली पाहिजे. अन्यथा शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आंदोलन करेल असा गंभीर इशारा दानवे यांनी यावेळी दिला.

या प्रकरणामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, न्यायलयीन आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करून उमेदवार सौ. सावित्रीबाई हिरालाल वाणी यांना मशाल चिन्ह देण्यात यावे, अशी जोरदार मागणी शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उमेदवारांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीसीआय मार्फत राज्यातील हमीभाव कापूस खरेदीसाठी 'किसान ॲप'वर नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ द्या

## राजकिशोर मोदी, ॲड.विष्णुपंत सोळंके यांची मागणी, उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांचा सकारात्मक प्रतिसाद

अंबाजोगाई (तभा वृत्तसेवा)
सीसीआय मार्फत राज्यातील हमीभाव कापूस खरेदीसाठी कापूस किसान मोबाईल ॲपवर नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी, संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांना गुरूवारी बीड येथे प्रत्यक्ष भेट घेऊन दिलेल्या निवेदनातून केली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी सदरील मागणी ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची आहे. याविषयी आपण स्वतः जातीने लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय देवूत अशी ग्वाही आणि सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी संचालक मोदी आणि सोळंके यांना दिला.

महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी, संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची गुरूवार, दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी बीड येथे प्रत्यक्ष भेट घेतली. आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा करून एक निवेदन दिले. दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, एम.एस.पी योजने अंतर्गत सन २०२५-२०२६ मध्ये शासकीय हमीभाव कापूस शेतकऱ्यांना सीसीआयला विक्री करण्यासाठी कापूस किसान मोबाईल ॲप नोंदणी करून आपल्या स्वनोंदणी प्रमाणे स्लॉट बुक करून मिळेल. त्या तारखेस शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्रीस आणण्याची तरतुद आहे. कापूस सीसीआयला विक्रीसाठी शेतकऱ्यांना कापूस किसान मोबाईल ऑपवर नोंदणी करणेसाठी अंतिम तारिख ३०/१०/२०२५ पर्यंत दिलेली होती. शेतकऱ्यांची व राज्य शासनाचे वेळोवेळी मागणीनुसार ही तारीख वाढवून दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत देण्यात आली होती. परंतु, राज्यातील अगणीत शेतकऱ्यांना मुदतीत नोंदणी ही तांत्रीक व नेटवर्कचे कारणांमुळे करता आलेली नाही. म्हणुन शेतकऱ्यांनी तसेच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्य शासनाकडे सदर मुदत वाढविण्याची मागणी केली असता. सदर मुदत दिनांक १६/०१/२०२६ ही करणेत आलेली आहे. तरी परंतु, ही मुदत सुध्दा शेतकऱ्यांसाठी अपुरी आहे. कारण, कापूस किसान मोबाईल ॲपवर माहिती भरण्यासाठी इंग्रजी भाषेचा वापर करणेची मुख्य अट आहे. सामान्य शेतकऱ्यांना इंग्रजी भाषा अवगत नसल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. तसेच राज्यातील ग्रामीण भागात मोबाईलला म्हणावे तेवढे नेटवर्क मिळत नाही. कव्हरेज मिळत नाही. अशा अनेक अडचणी आहेत. यापुर्वी सन २०१९-२०२० मध्ये कोरोना काळात (एम.एस.पी) अंतर्गत हमी भावाने कापूस खरेदी ही दिनांक १३/०८/२०२० पर्यंत शेतकऱ्यांचा संपुर्ण कापूस खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा केवळ आपल्या मार्फत मिळालेला आहे. राज्यातील अनेक कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाची नोंदणी ही कापूस किसान मोबाईल ॲपवर करणे अद्याप बाकी आहे. करिता सदरील ॲपवर कापूस विक्रीच्या नोंदीची मुदत ही दिनांक ३० एप्रील २०२६ पर्यत करणे गरजेचे असल्यामुळे तशा सुचना सीसीआय बेलापूर व मुंबईला देण्यात येणे गरजेचे आहे. तरी विनंती की, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस (एम.एस.पी) अंतर्गत सीसीआयला विक्री करण्यासाठी कापूस किसान मोबाईल ॲप नोंदणीची मुदत दिनांक ३० एप्रील २०२६ पर्यत करणे बाबतच्या सुचना सीएमडी ऑफिस बेलापूर, नवी मुंबई यांना देण्यात याव्यात अशी सविनय विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी आणि संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांना न्याय देणार

**सीसीआय मार्फत राज्यातील हमीभाव कापूस खरेदीसाठी कापूस किसान मोबाईल ॲपवर नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी माझ्या माध्यमातून राज्य सरकारकडे केली आहे. सदरील मागणी ही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची आहे. याविषयी आपण स्वतः जातीने लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय देवूत.**

~ ना.अजितदादा पवार
(उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य.)

### कापूस उत्पादकांना आधाराची गरज

**अतिवृष्टीचा परिणाम, यावर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे कापसाच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे आणि ओलावा जास्त असल्याने शेतकरी वेळेत कापूस विकू शकले नाहीत. म्हणून शासकीय मदत होईल या विचाराने कापूस महामंडळ (सीसीआय) शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी हमीभावाने कापूस खरेदी करीत आहे, ज्यासाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक आहे. याकरिता सरकारने तातडीने ही मुदत वाढ करावी.**

~ राजकिशोर मोदी
(संचालक, कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर.)

### मुदत वाढल्यास शेतकऱ्यांना फायदा :

**कपास किसान ॲपमुळे शेतकरी घरबसल्या नोंदणी करू शकतात. पण, पावसामुळे उशिरा कापूस तयार झाल्याने त्यांना मुदतवाढीची गरज आहे. कापूस महामंडळाने कपास किसान ॲपद्वारे नोंदणीसाठी १६ जानेवारी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची कापूस खरेदीची प्रक्रिया सुरू आहे आणि यावर्षी अनेक केंद्रांवर अपेक्षेपेक्षा कमी कापूस खरेदी झाला आहे. त्यामुळे राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आणि लोकप्रतिनिधींकडून ही खरेदीचा कालावधी आणि नोंदणीची अंतिम मुदत वाढविण्याची मागणी होत आहे, जेणेकरून सर्व शेतकऱ्यांना फायदा मिळेल.**

~ ॲड.विष्णुपंत सोळंके
(संचालक, कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर.)

# आबा व दादा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या पाठीशी

## ज्येष्ठ नागरिकाच्या सर्व समस्या प्राधान्याने सोडविणार. बदामराव पंडित व बाळराजे पवार




गेवराई( प्रतिनिधी )
गेवराई शहरातील नगर परिषदेतील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई व ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते .याप्रसंगी सर्वप्रथम श्री जगदंबा जेष्ठ नागरिक सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे यांनी संस्थेच्या कार्याची व ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांसमोर सादर करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक या संस्थेच्या वतीने पुरस्कार प्राप्त, गुणवंत विद्यार्थी सत्कार, विविध वाढदिवस, अधिकाऱ्या चे सत्कार, ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने ग्राहक जागृती करणे व विविध समस्या सोडविण्यात ग्राहक पंचायत यांना यश प्राप्त झाले आहे अशी माहिती अनिल बोर्डे यांनी समस्याचे निवेदन नगरपरिषद यांना दिले आहे उपस्थितता समोर दिली.

त्यानंतर बदामरावजी पंडित यांनी जेष्ठ नागरिकांच्या स्थानिक समस्या व शासन स्तरावरील समस्या सोडविण्यात येतील असे प्रत्यक्ष सांगितले. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यात येतील. त्यानंतर बाळराजे पवार यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या सर्व समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले तसेच श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे यांनी सेवा निवृत्तीनंतर केलेले कार्य कौतुकास्पद आहे असे सांगितले. तसेच ज्येष्ठ नागरिक हे आमचे मार्गदर्शक असून त्यांना विविध सेवा गेवराई शहरात उपलब्ध करून देण्यात येतील असे प्रत्यक्ष सांगण्यात आले . यापुढे आम्ही तुम्हाला आमच्याकडे येण्यासाठी आवश्यकता पडू देणार नाही तुमच्याकडे येऊन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चंदने सर व आभार प्रदर्शनाचे काम श्री हजारे सर यांनी केले.

याप्रसंगी रोहित पंडित, शिनूभाऊ बेदरे, प्राचार्य डॉक्टर विजय कुमार बांदल दामोदर पानखडे व संस्थेचे विजयकुमार बोर्डे, गणेश रामदासी, बाळासाहेब जोशी, ॲड वहिद विश्वास चपळगावकर अशोक देऊळगावकर , गिरी आधी हजर होते .

# वाघोरा शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी




माजलगाव दि.३ (प्रतिनिधी): तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळेत दि.३ जानेवारी शनिवार रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आनंदोत्सवात साजरी करण्यात आली.

सदरील कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची प्रतिमा पूजन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रंजना भुम्बर ,नीता सटाले,रुक्मिण बादाडे, सुनिता कोरडे, संगीता बादाडे, आशाबी पठाण, नंदा नवगीरे व सावित्रीबाई फुले वेशभूषेतील विद्यार्थिनीनी प्रतिमापूजन केले. प्रमुख पाहुण्यांचे विद्यार्थिनी अंजली बादाडे, आरती नाईक नवरे, इरम शेख, अस्मिरा शेख,भक्ती डाके, लक्ष्मी नाईकनवरे यांनी स्वागत गीतातून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य, गीत गायन सादर केली. सावित्रीबाई वर आधारित स्वरचित गीत गणेश झाटेसरांनी सादर केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन संजय राठोड, माधव गड्डापोड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली बादाडे व लक्ष्मी नाईकनवरे, आकर्षक सुंदर फलक लेखन व छायाचित्रण केशव बादाडे यांनी केले.

# लोकनेते सोळंके साखर कारखान्यात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



तेलगाव, (प्रतिनिधी) = भारतात स्त्रीयांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखान्यात शनिवारी उत्साहात साजरी करण्यात आली.

भारतात स्त्रीयांना शिक्षण मिळावे,त्या सुशिक्षित होऊन स्वकर्तृत्वावर जीवन जगाव्यात यासाठी मोठे योगदान देणाऱ्या स्त्री शिक्षणाच्या जननी ,क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यालयात कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमात सचिव सुरेश लगड यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी भारतराव शेळके, रामदास आगे,बळीराम निपटे, नानाभाऊ वाघचौरे,विठ्ठल पौळ, ज्ञानेश्वर ठोंबरे आदिसह कारखाना कर्मचारी कामगार उपस्थित होते.

# इलेक्ट्रॉनिक वजन काट्याची तपासणी करावी

बीड पृतिनिधी. केंद्र सरकारच्या ग्राहक संरक्षण अन्न वितरण मंत्रालयाने दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या नवीन अधिसूचनेमुळे व्यापारी वर्गात वजन आणि मापाच्या पडताळणी संबंधी मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाला आहे या पार्श्वभूमीवर बीड येथील वैद्यमापनशास्त्र विभागाने अधिकृत स्पष्टीकरण प्रसिद्ध केले आहे.

इलेक्ट्रॉनिक काट्यांची तपासणी पूर्वीप्रमाणेच दर वर्षीच करावी लागणार आहे. सोशल मीडियावरील चुकीच्या माहितीचा व्यापाऱ्यांनी गैरसमज निर्माण करून घेऊ नये असे आव्हान बीड जिल्हा वैद्य मापन शास्त्र विभागाने केले आहे केंद्र शासनाने वैद्यमापन शास्त्र नियम २०११ मधील नियम २७ अ क मध्ये महत्त्वाची सुधारणा केली आहे.

# श्री संस्थान कोरडे गणपतीच्या गणेश मित्र मंडळाने पटकावले गणराया अवॉर्ड

## सर्वांना सन्मानचिन्ह देवून पदाधिकाऱ्यांचा गौरव

**प्रतिनिधी । बीड**
बीड शहर पोलीस विभागाच्या वतीने आयोजित आदर्श गणराया स्पर्धा २०२५ मध्ये बीड शहरातील काळे गल्ली येथील श्री संस्थान कोरडे गणपतीच्या गणेश मित्र मंडळाने उत्कृष्ट कामगीरी करत द्वितीय क्रमांकाचे गणराय अवॉर्ड पटकावले आहे.


गणेशोत्सवातील आयोजीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस निरीक्षक शीतल कुमार बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मानचिन्हे प्रदान करून गौरव करण्यात आला.

२०२५ गणेशोत्सवच्या काळात या गणेश मित्र मंडळाने श्रींच्या भव्य व दिव्य आगमन सोहळ्यात शिवकालीन पारंपरिक मर्दानी खेळांचे सादरीकरण करत भाविकांचे लक्ष वेधले होते. उत्सवात मंडळाच्या वतीने बीड येथील पेट शेल्टर फाउंडेशनला भेट देऊन प्राण्यांसाठी मदत मदत, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. गणेश मूर्तीच्या आजूबाजूचा देखावा पर्यावरणपुरक साहित्यापासून तयार करण्यात आला होता. संपूर्ण सजावट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत: केली होती. श्रींच्या सन्मानार्थ शहाळे महोत्सव छप्पन्न भोगांची भव्य आरास करण्यात आली होती.

### गणेश मंडळाने जपला पारंपारीक वारसा

बीड शहरात लोकमान्य टिळकांच्या आदर्शांवर चालत हे गणेश मंडळ प्रत्येक वर्षी पारंपारीक गणेशोत्सव साजरा करत आहे. कोणतीही स्पर्धा किंवा अहंकार न ठेवता, शांततेत आणि उत्साहात समाजहित जपत पुढे जाणारे हे गणेश मंडळ भाविकांच्या दृष्टीने कौतुकास्पद ठरले आहे.

# मुंबईचे डॉ. भांगरे माजलगावकरासाठी रोज उपलब्ध



माजलगाव : शहरातील डॉ यशवंत राजेंभोसले यांच्या यशवंत हॉस्पिटल येथे मुंबई येथील प्रसिद्ध हृदयविकार तज्ञ डॉ प्रतीक भांगरे हे १ जानेवारी पासून दररोज उपलब्ध झाले आहेत. यामुळे माजलगाव च्या वैद्यकीय क्षेत्रात रुग्णासाठी हक्काचे व प्रदीर्घ अनुभव असलेले २४ तास सुविधा देणारे डॉक्टर उपलब्ध झाले आहेत.

डॉ प्रतिक भांगरे हे मूळ नगर येथील असून वोकहार्ट फोर्टिस हॉस्पिटल मुंबई येथे त्यांनी इंटरव्हेशनल कर्डीयॉलॉजिस्ट आणि कारडिओथोरेसिक सर्जन सोबत काम केले आहे. तसेच नेफ्रॉलोजी रेजिडेंट म्हणून कंडेव्हेरिक लिव्हिंग डोनर रेनल ट्रान्सप्लांट चा अनुभव, डायलीसिस व लिव्हर ट्रान्सप्लांट आयसीयू रजिस्ट्रार म्हणून मोठा अनुभव आहे.डॉ वसंतराव पवार मेडिकल कॉलेज नाशिक येथे ट्रामा आणि सर्जरी आय सी यु चें इन्टेन्सिवीस्ट तसेच राजीव गांधी मेडिकल कॉलेज येथे विषबाधा आणि सर्प दंशाच्या आपत्कालीन प्रकरणाचा अनुभव, तसेच जिल्हा रुग्णालय नाशिक येथे ए एस व्ही वापराचे मानकिकरण करून ३० व्हायलंची मर्यादा वैध्यकीय अधिकाऱ्याचे प्रशिक्षण आदी चा प्रदीर्घ अनुभव डॉ प्रतिक भांगरे यांना असल्यामुळे माजलगाव सह जिल्ह्यातील रुग्णांना याचा मोठा फायदा होणार आहे.

न्यूमोनिया, डायलीसिस, पॅरालिसीस, हृदयविकार, विषबाधा सारख्या प्रकरणात तात्काळ उच्च दर्जाचे उपचार आता माजलगावं सारख्या ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

### महात्मा फुले व प्रधानमंत्री आरोग्य योजनेत मोफत उपचार

**यशवंत हॉस्पिटल मध्ये महात्मा फुले व प्रधानमंत्री आरोग्य योजने अंतर्गत कॅन्सर, मुतखडा, गर्भपिशवी, अंजीओग्राफी, अंजिओप्लास्टि व हाडाच्या शस्त्रक्रिया होत आहेतच आता डॉ भांगरे मुळे यां योजने अंतर्गत विषबाधा व हृदयाशी निगडित आजरावरही उच्च दर्जाचे उपचार मिळणार आहेत.**

**२०१५ च्या कुंभमेळ्याच्या आपत्कालीन तयारीचे फर्स्ट रिस्पॉन्डर आणि बेसिक लाईफ सपोर्ट चें प्रशिक्षण शिवाय सेंट जॉन्स मेडिकल कॉलेज बेंगरूळू येथे ई आय सी यु व इमरजन्सी मेडिसिन चें प्रशिक्षण डॉ भांगरे यांनी घेतलेले असल्यामुळे माजलगाव पंचक्रोशीतील रुग्णासाठी मोठ्या शहरात जाण्याची आवश्यकता आता भासणार नाही.**

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बॅंक म. अंबाजोगाई
"दीनदयाळ भवन" परळी रोड,अंबाजोगाई. फोन-(०२४४६) २४६९२६/२७/२९
Email ID - agmdeendayalbank@gmail.com

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र./सरफेसी/०४/७०१६-३२/२१९/२०२५-२६ दिनांक:०३.०१.२०२६

नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. मे.दिग्विजय एंटरप्रायजेस प्रो.प्रा. अर्चना श्रीराम मुंडे ( कर्जदार )
पत्ता:- माणिक नगर,परळी (वै), ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
२. श्री.वैजनाथ नामदेव आंधळे
पत्ता:- वैजनाथ नामदेव, हेळंब, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
३. श्री. प्रभाकर अंबदास देशमुख
पत्ता:- अंबदास देशमुख, टी. पी. एस. रोड, शिवाजी नगर, परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
४. श्री. श्रीराम (प्रभू) प्रभाकर मुंडे
पत्ता:- माणिक नगर,परळी(वै) , ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
५. श्री. कैलास रमाकांत मुंडे
पत्ता:- स्वाती नगर,परळी, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
६. श्री. केशव रमाकांत मुंडे
पत्ता:- स्वाती नगर,परळी, ता.परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि
आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२

महोदय,
विषय:- नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- परळी(वै)
सुचना:- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक १८.०७.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. ७०१६-३२ रु. १,००,००,०००/- | (मालमत्ता मालक: श्री कैलास रमाकांत मुंडे आणि केशव रमाकांत मुंडे) गहाणदार/जामीनदार श्री कैलास रमाकांत मुंडे आणि केशव रमाकांत मुंडे यांच्या मालकीचे नगर परिषद जुना घर क्र.९२४, नवीन घर क्र. ११३२ ज्याचा सिटीएस क्र. ४४८१ मधील जुना वॉर्ड क्र. ६, नवीन वॉर्ड क्र. १०, पुर्व-पश्चिम-दक्षिण- बाजु २८'६, पुर्व-पश्चिम-दक्षिण- बाजु २९' आणि दक्षिण-उत्तर ४१ फु. एकूण क्षेत्रफळ १०९.५४ चौ. मी. म्हणजे ११७८.६५ चौ.फुट. बांधलेले व ज्या स्थितीत असेल तसे स्वाती नगर, परळी वै, जि. बीड ज्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणे :- पुर्व :-सोमनाथप्पा हालगे यांचे प्लॉटींग क्षेत्र; पश्चिम :- मीरा किशोर काटकर यांचा प्लॉट.; दक्षिण :- २० फुट रुंद रस्ता; उत्तर :- लोखंडे यांचा प्लॉट . ("वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत") | मुद्दल + व्याज एकुण रु. १,०७,७५,६९६/- अधिक दिनांक ३१.१२.२०२५ रोजी पुढील व्याज @ ११.८५ %दिनांक०१.०१.२०२६ पासुन |

• वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
• अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४) घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २९.०७.२०२१
ब. .गहाणखत नोंदणी दिनांक ०३.०२.२०१८(गहाणखत नोंदणी क्र.-२९९/२०१८)

५) म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६) वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कमव्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे मुद्दल + व्याज एकुण रु. १,०७,७५,६९६/- अधिक दिनांक ३१.१२.२०२५ रोजी पुढील व्याज @ ११.८५ % दिनांक०१.०१.२०२६ पासुन आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक ०५.०३.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

ठिकाण:- अंबाजोगाई

श्री.अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ५५४ जणांची माघार, तरीही 'बंडोबा' रिंगणातच

## छत्रपती संभाजीनगर मनपा निवडणूक: ८६० उमेदवारांमुळे लढती होणार 'बहुरंगी'!

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ डिसेंबर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या आखाड्यातून गुरुवारी (दि. २) अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. वरिष्ठांच्या दबावानंतर आणि 'मनधरणी' अस्त्राचा वापर केल्यानंतर शहरातून तब्बल ५५४ उमेदवारांनी माघार घेतली असली, तरी बंडखोरी पूर्णपणे शमलेली नाही. अंतिम यादीनुसार ८६० उमेदवार नशीब आजमावणार असून, यामुळे शहरातील बहुतांश प्रभागांत थेट लढतीऐवजी 'बहुरंगी' सामने रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सकाळपासूनच सर्वच प्रमुख पक्षांच्या कार्यालयात हालचालींना वेग आला होता. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी आपल्या अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा करण्यासाठी अपक्षांवर दबाव टाकला. यात काही प्रमाणात यश आले असून




५५४ जणांनी माघार घेतली. मात्र, तरीही ८६० उमेदवार रिंगणात असल्याने मतांचे विभाजन कोणाच्या पथ्यावर पडणार आणि कोणाचा गेम बिघडवणार, यावर आता चर्चा झडू लागल्या आहेत. प्रामुख्याने ज्या प्रभागांत बंडखोर उमेदवार प्रबळ आहेत, तिथे अधिकृत उमेदवारांची झोप उडाली आहे.

प्रभाग २६, २८, २९ ठरले 'हॉटस्पॉट'

निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ८ यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २६, २८ आणि २९ मध्ये सर्वाधिक चुरस पाहायला मिळत आहे. या तीन प्रभागांत मिळून सर्वाधिक १२५ उमेदवार रिंगणात आहेत. एका प्रभागात सरासरी ४० हून अधिक उमेदवार असल्याने येथे ईव्हीएम मशीनची संख्याही वाढण्याची शक्यता आहे. या गर्दीमुळे मतदारांचा गोंधळ उडण्याची भीती व्यक्त होत असून, येथील लढती सर्वाधिक लक्षवेधी ठरणार आहेत.

**अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला; प्रभाग क्रमांक २६, २८, २९ मध्ये सर्वाधिक गर्दी, तर 'एमआयएम'च्या माघारीने समीकरणे बदलली**

**'एमआयएम'च्या चालीने गणिते बदलली?**

निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ३ (प्रभाग ६, १२, १३, १४) च्या अहवालानुसार, एमआयएम पक्षाच्या (-चखच्) परवीन कैसर खान यांनी उमेदवारी मागे घेतल्याची विशेष नोंद आहे. या प्रभागांत एमआयएमची वोट बँक निर्णायक मानली जाते. खान यांच्या माघारीमुळे या प्रभागातील राजकीय गणिते पूर्णपणे बदलली असून, याचा फायदा कोणाला होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येथे ९१ उमेदवार रिंगणात आहेत.

**९७ अर्ज बाद, आता प्रचार तापणार**

सुरुवातीच्या छाननी प्रक्रियेत तांत्रिक कारणास्तव ९७ अर्ज बाद ठरले होते. आता चित्र स्पष्ट झाले असून, शुक्रवारपासून शहरात प्रचाराचा धुराळा उडणार आहे.

विभागनिहाय लढतीचे चित्र

सर्वाधिक उमेदवार: १२५ (अधिकारी क्र. ८ - प्रभाग २६, २८, २९).

सर्वात कमी उमेदवार: ७१ (अधिकारी क्र. ९ - प्रभाग १८, १९, २०).

सर्वाधिक माघार: ९१ (अधिकारी क्र. ७ - प्रभाग २१, २२, २७)

एकुणातच, ५५४ जणांची माघार होऊनही ८६० उमेदवारांची फौज मैदानात असल्याने ही निवडणूक केवळ पक्षीय ताकदीवर नसून, वैयक्तिक जनसंपर्क आणि बंडखोरांच्या उपद्रवमूल्यावरच ठरणार, असे दिसते.

# आमेर पटेल यांनी स्वीकारला नगराध्यक्षपदाचा पदभार

**तभा वृत्तसेवा,**

**खुलताबाद , दि. ३ डिसेंबर :** खुलताबाद नगरपरिषदेचे नवनिर्वाचित काँग्रेसच्या नगराध्यक्ष सय्यद आमेर पटेल दि. १ जानेवारी गुरुवारी दुपारी प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद समीर शेख खुलताबाद यांच्याकडून नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला.



याप्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अबेद भाई जहागीरदार यांनी खुलताबाद शहरातील सर्व समाज बांधवांनी ज्या काँग्रेस पक्षावर विश्वास टाकून नगरसेवक व काँग्रेसच्या नगराध्यक्ष निवडून दिल्याबद्दल नागरिकांचे काँग्रेस पक्षाकडून आभार मानले व नगरपरिषद प्रशासन नगराध्यक्ष व सर्वपक्षीय नगरसेवक यांनी खुलताबाद शहर च्या विकासाच्या बाबतीत नागरिकांच्या सुख सुविधा रोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावे . नवनिर्वाचित नगराध्यक्ष अमीर पटेल यांनी खुलताबाद शहराच्या विकासासाठी आपण सर्वांना सोबत घेऊन जनतेच्या विकासाच्या कामासाठी प्रयत्न करणार असल्याचे आपल्या मनोगत सांगितले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी नगरसेवक काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सत्यनारायणाची दादे यांनी केले. याप्रसंगी नवनिर्वाचित उपस्थित नगरसेवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल नलावडे, माजी तालुकाध्यक्ष अनिल श्रीखंडे, शहराध्यक्ष माजिद मनियार, माजी उपनगराध्यक्ष मकसूद पटेल यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. नगरपरिषद कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे जितेंद्र बोचरे श्रीहरी चौडेकर अश्विनी नंद अंकुश भराड पाटील. जय किशन दळवी, मनीषा लघाने, सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# साची जिवणे विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिकाची मानकरी

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या पदवी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली गुणवंत विद्यार्थिनी साची चंदू जिवणे हिला यंदाचे मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर स्मृती पारितोषिक जाहीर झाले आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या प्राचार्या डॉ.रेखा शेळके यांनी ही माहिती दिली.

मराठी पत्रकारितेतील ज्येष्ठ संपादक मंगला विंचुर्णे-बर्दापूरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या या पारितोषिकाचे हे पाचवे वर्ष आहे. एमजीएम विद्यापीठ आणि बर्दापूरकर कुटुंबीय यांच्या संयुक्त योगदानातून हे पारितोषिक सुरू करण्यात आले असून, त्यामध्ये रोख रक्कम व स्मृतिचिन्हाचा समावेश आहे. शैक्षणिक गुणवत्ता, पत्रकारितेतील बांधिलकी आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा सन्मान म्हणून हे पारितोषिक दिले जाते.

राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया मधील विनोबा भावे सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दैनिक सकाळचे समूह संपादक सम्राट फडणीस यांच्या हस्ते साची जिवणे हिला सन्मानित करण्यात येईल. कार्यक्रमासाठी कुलपती अंकुशराव कदम आणि ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर यांची विशेष उपस्थिती असणार असून अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ हे असणार आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील साची जिवणे ही पत्रकारितेची विद्यार्थिनी असून तिने बीबीसी मराठी, लोकमत टाईम्स, युनिसेफ आणि बाईमाणूस पोर्टल येथे प्रत्यक्षपणे कामाचा अनुभव घेतला आहे. इंग्रजी बातमी लेखन, संपादन, स्टोरीटेलिंग, कंटेंट क्रिएशन आणि सोशल मीडिया न्यूज प्रॉडक्शनमध्ये ती कुशल आहे. राष्ट्रीय युवा संसदेत तिला दोनदा 'बेस्ट पार्लमेंटेरियन'चा सन्मान मिळाला आहे.




**छत्रपती संभाजीनगर :** सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने सातारा परिसरातील बाल ज्ञान मंदिर येथे आयोजित उपक्रमात चिमुकल्यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान करून सामाजिक प्रबोधन आणि शिक्षणमूल्यांचा प्रभावी संदेश दिला.

# 'अभिरूप युवा संसद' स्पर्धेत एमजीएम विजयी

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.२ जानेवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या



(सीसीसीएम) संघाने 'अभिरूप युवा संसद २०२५-२६' या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सलग सहाव्यांदा विजेतेपदाचा मान मिळवला आहे. युवक बिरादरी (भारत) यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा राज्यातील एक मानांकित संसदीय अनुकरण मंच मानली जाते.

१६ ते ३० वयोगटातील युवकांमध्ये लोकशाही मूल्ये, नेतृत्व क्षमता, धोरणात्मक दृष्टिकोन आणि संसदीय कार्यपद्धतीची सखोल समज विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विभागीय फेरीत विविध महाविद्यालयांनी सहभाग घेतला. प्रत्येक संघाने ६० मिनिटांचे मॉक पार्लमेंट सत्र सादर केले, ज्यामध्ये शून्य प्रहर, प्रश्नोत्तर तास आणि विधीमंडळीय चर्चा यांचा समावेश होता.

सीसीसीएमच्या १५ विद्यार्थी संसदपटूंनी अभ्यासपूर्ण तयारी, प्रभावी भाषणे आणि शिस्तबद्ध सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचे आयोजन युवक बिरादरीचे कार्यक्रम संचालक सचिन वाकुलकर यांच्या नेतृत्वाखाली झाले असून परीक्षक म्हणून रुपेश कलंत्री व साई महाशब्दे उपस्थित होते.

वैयक्तिक कामगिरीत खुशी तुरे हिला 'उत्कृष्ट संसदपटू' द्वितीय, तर साची जिवने व पल्लवी बेडरे यांना संयुक्तपणे तृतीय पारितोषिक मिळाले. ही फेरी राष्ट्रीय अंतिम स्पर्धेसाठी पात्र ठरली असून ती १२ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे होणार आहे.

या यशाबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांनी अभिनंदन केले. संघाला प्रा. डॉ. आशा देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.



# सोयगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.३ जानेवारी :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल आपल्या सुंदर अशा भाषणातून प्रकाश टाकला. तसेच स्त्री सुरक्षितता या विषयावर नाटिकाचे सादरीकरण केले. तसेच अनेक विद्यार्थिनी यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा तर विद्यार्थी यांनी समाजसुधारक ज्योतिबा फुले यांची वेशभूषा प्रदान केली. यावेळी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, पंकज रगडे, सुरेखा चौधरी, शिक्षक रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे, प्रतिभा कोळी, मंदा मस्के, सविता पाटील, पूनम लाड, गणेश बाविस्कर, अंकुश काळे, विकार शेख, बिलाल बागवान यांनी परिश्रम घेतले.

# पंचायतराज अभियानांतर्गत जरंडीचे पालटले रुप

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.३ जानेवारी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीच्या वतीने श्रमदान व स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले.या अभियानामुळे संपूर्ण गाव स्वच्छ,सुंदर व सुरक्षित झाले आहे.या उपक्रमांतर्गत संपूर्ण गावाचीस्वच्छता करण्यात आली. गावातील मुख्य रस्ते, अंतर्गत गल्ल्या, बाजार चौक, हुतात्मा स्मारक, सार्वजनिक ठिकाणे तसेच गावाच्या सर्व प्रवेशद्वारांची साफसफाई करण्यात आली. यासोबतच गावातील गटार व नाल्यांची पूर्णतः साफसफाई करून साचलेला काढण्यात कचरा आला. ज्यामुळे पाण्याचा प्रवाह सुरळीत झाला. स्वच्छता मोहिमेचा भाग म्हणून बाजार ओटे व हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता करून स्वच्छ करण्यात आला. तसेच जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, महात्मा फुले विद्यालय व परिसराची, शाळेच्या मैदानाची तसेच शाळांच्या प्रवेशद्वारांची स्वच्छता करण्यात आली. हुतात्मा स्मारक, स्मशानभूमीत झाडे लावण्यात आली. विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला.

या अभियानाच्या माध्यमातून जरंडी संपूर्णपणे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या सुरक्षेत आले आहे. शाळा परिसर डिजिटल करण्यात आला. संगणक वाचनालय करण्यात आले असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे शाळा व गावाची सुरक्षा अधिक मजबूत झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत, सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पाटील, अमृत राठोड,दिलीप पाटील, मधुकर पाटील, मधुकर सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे व ग्रामपंचायत सदस्यांच्या सहकार्याने स्वच्छ करण्यात आला. नागरिकांच्या सहकार्यामुळे आज जरंडीत केवळ स्वच्छच नव्हे तर अधिक सुंदर, सुरक्षित आणि आदर्श गाव बनले आहे. हे जरंडीच्या सर्व नागरिकांसाठी अभिमानास्पद असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# थोडक्यात...

## स्कोडाच्या विक्रीत १०७ टक्केनी वाढ



**छत्रपती संभाजीनगर :** स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील २५ व्या वर्धापनदिनानिमित्त २०२५ हे आतापर्यंतचे सर्वात यशस्वी वर्ष म्हणून नोंदवले. कंपनीने २०२५ मध्ये ७२,६६५ वाहनांची विक्री करत २०२४ च्या तुलनेत १०७ टक्के वार्षिक वाढ साध्य केली. कायलॅकला मिळालेला दमदार प्रतिसाद, कुशक-स्लाव्हियाची सातत्यपूर्ण मागणी, कोडियकची प्रीमियम उपस्थिती आणि ऑक्टाव्हिया आर.एस.च्या पुनरागमनाने ब्रँडची गती अधिक मजबूत केली. १८३ शहरांत ३२५ हून अधिक ग्राहक संपर्कबिंदूंमुळे नेटवर्क विस्तार साध्य झाला. ग्राहककेंद्रित धोरण, उत्पादन आक्रमकता आणि विश्र्वासार्ह ब्रँड इक्विटीमुळे स्कोडा ऑटो इंडियाची बाजारातील स्थिती अधिक भक्कम झाली आहे.

## कै. बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथे सावित्रीबाईंना अभिवादन



सोयगाव : येथील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथे शाळेच्या प्रांगणात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील, उपमुख्याध्यापक प्रा. ज्ञानेश्वर एलिस, सागर घाटे, प्रा. दादासाहेब पवार, प्रा.योगेश काळे, सीता पगार, जयश्री श्रीवास्तव, आशा गणगे, अंजली कथलकर, अरुणा भाई, रुपाली मानकर, रंजना जाधव, नलिनी पाटील, उषा ढेपले आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी देवानंद आव्हाड, ज्ञानेश्वर पंडित, रमेश कंडारे, सुनीता जाधव, लताबाई गायकवाड यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन समीक्षा ताडे हिने केले तर आभार कुमारी प्रांजल पाटील यांनी केले.

## एंडोस्कोपिक शस्त्रक्रियेद्वारे ३९ वर्षीय महिलेच्या पिट्युटरी ट्युमरवर यशस्वी उपचार

**पुणे :** मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी अत्याधुनिक आणि चीरा ना मारता (दुर्बिणीद्वारे) एंडोस्कोपिक एंडोनेझल ट्रान्सस्फेनॉइडल तंत्राचा वापर करून मेंदूच्या तळाशी असलेला पिट्युटरी मॅक्रोॲडेनोमा हा जटिल ट्युमर यशस्वीपणे काढून टाकला. या ३९ वर्षीय महिला रुग्णाला दीर्घकाळ तीव्र डोकेदुखी आणि दोन्ही डोळ्यांची दृष्टी हळूहळू कमी होण्याची समस्या होती. अनेक नेत्रतज्ज्ञांकडे उपचार घेऊनही दृष्टीत सुधारणा न झाल्याने अखेरीस त्यांना मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील न्यूरोसर्जन डॉ. सचिन पाटील यांच्याकडे पाठविण्यात आले.सखोल तपासणी आणि मेंदूच्या ३ टेस्ला एमआरआयमध्ये मेंदूच्या मध्यभागी व तळाशी असलेला, मोठा पिट्युटरी ट्युमर दोन्ही डोळ्यांच्या नसांवर दाब देत असल्याचे स्पष्ट झाले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या दृष्टीत सुधारणा होण्याची सुरुवातीची लक्षणे दिसून आली असून इतर तक्रारींमध्येही लक्षणीय घट झाली आहे.

## फुफ्फुसाच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन : डॉ. आशिष गाडे

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ आशिष गाडे, सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स सांगतात, छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णाला जिने चढणे यासारख्या साध्या क्रियाकलापांमध्ये सतत खोकला आणि श्र्वास लागणे लक्षात येईपर्यंत सक्रिय जीवन जगले. ही वयाशी संबंधित समस्या किंवा हंगामी ॲलर्जी आहे असे गृहीत धरून, त्याने वैद्यकीय मदत घेण्यास उशीर केला. कालांतराने, त्याची प्रकृती खराब होत गेली, वारंवार घरघर येणे आणि तीव्र थकवा जाणवू लागला. मेडिकव्हर हॉस्पिटल्सला भेट देईपर्यंत, त्याच्या फुफ्फुसाच्या कार्यामध्ये लक्षणीय तडजोड झाली होती आणि त्याला क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) असल्याचे निदान झाले. रुग्णाची कथा सीओपीडी निदानाचा वाढता कल दर्शवते. भारतात, सीओपीडीचे निदान होत नाही, बहुतेकदा तो धूम्रपान करणाऱ्यांचा रोग किंवा दमा म्हणून नाकारला जातो. तथापि, बायोमास इंधनासह स्वयंपाक केल्यामुळे घरातील वायू प्रदूषणास सामोरे जाणाऱ्या महिलांसह धूम्रपान न करणाऱ्यांनाही धोका असतो. अलीकडील डेटावरून असे दिसून आले आहे की सीओपीडी महिलांपेक्षा अधिक पुरुषांना प्रभावित करते, शहरी भागात पुरुष-महिला प्रमाण अंदाजे २:१ आहे. तथापि, ग्रामीण सेटिंग्जमध्ये, खराब हवेशीर घरांमध्ये घन इंधनाच्या व्यापक वापरामुळे हे अंतर कमी होते.

## संकटांवर मात करत नव्या सुरुवातीकडे : सुमित राय

**मुंबई :** सुमित राय, एमडी आणि सीईओ, एडलवाईस लाईफ इन्शुरन्स सांगतात सर्वच निकषांनुसार २०२५ हे वर्ष घटनापूर्ण राहिले. भारताची अनेक आघाड्यांवर परीक्षा पाहिली गेली - अमेरिकेसोबतचे शुल्क युद्ध, शेजारील देशासोबतची थोडक्यात पण तणावपूर्ण लष्करी चकमक आणि रुपयावरील सततचा दबाव. तरीही, भारतीय अर्थव्यवस्था टिकून राहिली; देशांतर्गत खप मजबूत राहिला, विकासाचा वेग वाढला आणि महागाई विक्रमी नीचांकी पातळीवर आली - हे भारताच्या एकत्रित धोरणात्मक प्रयत्नांचे यश आहे. हे वर्ष सामान्य माणसाचे देखील ठरले, कारण आरबीआयने केलेली एकूण १२५-बीपीएसची व्याजदर कपात, आर्थिक वर्ष २०२६ च्या अर्थसंकल्पातील वैयक्तिक कर सुधारणा आणि जीएसटी २.० सुधारणांमुळे कुटुंबांच्या खर्च करण्यायोग्य उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली.

## अस्थिर जग, स्वतःला सावरणारा भारत: बाजार, मॅक्रो आणि पुढचा प्रवास : रितेश टकसली

**मुंबई :** रितेश टकसली, मुख्य गुंतवणूक अधिकारी, एडलवाइस लाइफ इन्शुरन्स सांगतात वर्ष २०२५ हे जागतिक आणि भारतीय बाजारपेठांमध्ये अस्थिरता आणि एकत्रीकरणाचे वर्ष ठरले. भू-राजकीय संघर्ष, बदलती व्यापार धोरणे आणि विकास व महागाईबाबतचे परस्परविरोधी प्रवाह यामुळे ही स्थिती निर्माण झाली. जानेवारीत सुरू झालेल्या ट्रम्प यांच्या दुसऱ्या अध्यक्षीय कार्यकाळामुळे अमेरिकेच्या व्यापार धोरणात मोठे बदल झाले आणि आयात शुल्कात वाढ झाली. यामुळे जागतिक आर्थिक मंदीची भीती व्यक्त केली जात असली, तरी त्याचा परिणाम सुरुवातीला वाटला होता त्यापेक्षा मर्यादित राहिला. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तंत्रज्ञान कंपन्यांची मोठी गुंतवणूक आणि एआयचा वाढता वापर यामुळे या आव्हानांचा प्रभाव कमी होण्यास मदत झाली.


### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद, (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०२६

१)शेनफडाबाई पंढरीनाथ गव्हांडे, वय ७९ वर्ष, धंदा घरकाम, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) राजेंद्र पंढरीनाथ गव्हांडे, वय ४६ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३) सवित्ताबाई आत्माराम भोंबे वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. आडगाव भोंबे ता.भोकरदन, जिल्हा जालना.

विरूद्ध- निल

प्रकरण - वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पंढरीनाथ नामदेव गव्हांडे यांचा दि. १४.०७.२०२४ मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत पंढरीनाथ नामदेव गव्हांडे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी बारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि. ०२.०१.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २५.०२.२०२६ आदेशावरून

**क. लिपीक (दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**

**सहाय्यक अधीक्षक (दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**

**प्रतिलीपी :**

**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव**

**२) ग्रामपंचायत पळासखेडा ता सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. ८८३/ २०२५.

पु.ता.४/२/२०२६

अर्जदार : १) कैलास सुखदेव उर्फ सुका खाजेकर, वय ४० वर्षे, धंदा. मजुरी, रा. नेवरगाव, ता. गंगापुरजि. औरंगाबाद, २) कौशल्याबाई सुखदेव उर्फ सुका खाजेकर, वय ७३ वर्षे, धंदा. निरंक, रा. नेवरगाव, ता. गंगापुरजि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन क्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिपप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्रमिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्जदाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क.२ चे पती व अर्जदार क. १ चे वडील सुखदेव उर्फ सुका त्रिंबक खाजेकर हे दि. २४/०९/२०१८ रोजी नेवरगांव, ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सुखदेव उर्फ सुका त्रिंबक खाजेकर यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत सुखदेव उर्फ सुका त्रिंबक खाजेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्का त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

**सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर. एस. तापडीया सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ६११/२०२५ पुढील तारीख : १६/२/२०२६

अर्जदार

शकुंतलाबाई भ्र. सिताराम ठाले, वय ६२ वर्षे, धंदा परकाम, रा. स्नेहनगर, सुवर्ण पालेश्वर कॉलनी, कन्नड, ता. कनड, जि. छ.संभाजीनगर

गैरअर्जदार

- विरुध्द

अर्ज : निरंक

कलम ३७२ भारतीय वारसा कायदया प्रमाणे सक्सेशन सटीफिकेट मिळणे बाबत. ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. अनंत के. शेजवळ, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही स्नेहनगर, सुवर्णपालेश्वर कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छ. संभाजीनगर येथील राहणारी असून तिने सदरील अर्ज सक्सेशन सर्टीफीकेट मिळावे म्हणून या न्यायालयात प्रस्तुत प्रकरण दाखल केले आहे. मयत सिताराम भिकाजी ठाले हे अर्जदाराचे पती असुन ते (एम.एस.ई.बी.) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात स्टोअर किपर या पदावर नौकरीस होते ते २००५ साली सेवा निवृत्त झाले असून दिनांक ६.६.२००५ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे नांव महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमीटेड असे आहे. सिताराम भिकाजी ठाले हे दिनांक ५.३.२०२३ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी मृत्यु पावले असून त्यांचा अंत्यविधी कन्नड ता. कन्नड येथे संपन्न झाला, त्यांच्या मृत्युची नोंद नगर परिषद, कन्नड येथे झालेली असून त्यांनी दिलेले मृत्यु प्रमाण पत्र सोबत अवलोकनार्थ रेकॉर्डवर दाखल करीत आहे. अर्जदार ही मयत सिताराम भिकाजी ठाले यांची पत्नी असून तिचा मयत सिताराम ठाले यांचे सोबत विवाह झाला असून त्या विवाहाची नोंद विवाह निबंधक, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्रामीण रुग्णालय, कन्नड यांच्याकडे झाली असून त्यांनी अर्जदार हिस विवाह नोंदणी प्रमाण पत्र दिनांक २५.८.२०२३ रोजी दिलेले या कोर्टाच्या अवलोकनार्थ रेकॉर्डवर दाखल केले आहे. अर्जदार हिस मयत सिताराम भिकाजी ठाले यांचे पासून एक मुलगा नामे गौरव सिताराम ठाले झाला होता, जो त्याच्या वयाच्या २८ व्या वर्षी अविवाहीत असतांनाच मृत्यु पावला, त्याच्या मृत्युची नोंद नगर पालिका कन्नड येथे झाली असून नगर पालिका कन्नड ने दिलेला मृत्युचा दाखला सोबत अवलोकनार्थ रेकॉर्डवर दाखल केला आहे. मयत सिताराम भिकाजी ठाले यांना अर्जदाराशिवाय दुसरे कुणीही वारस नाही. अर्जदार ही एकमेव वारस आहेत. मयत सिताराम भिकाजी ठाले यांचा पी.पी.ओ. नंबर एनजीएयुआर०००२२११८ असा असुन त्यांच्या मृत्यु पश्र्चात त्यांच्या नावे संबंधीत कार्यालयात आर.ओ.सी. रक्कम रुपये १,५३,४००/- कार्यालयात जमा असून सदरील रक्कम तसेच मासिक निवृत्ती वेतन हे अर्जदारास मिळण्या करीता सक्सेशन सर्टीफीकेटची आवश्यकता आहे. वरील रकमेची व मासिक निवृत्ती वेतनाची अर्जदाराने संबंधीत कार्यालयात मागणी केली असता त्यांनी संबंधीत कोर्टा कहुन सक्सेशन सर्टीफीकेट या कार्यालयात सादर करण्याचे कळविल्याने प्रस्तुत अर्जास कारण घडले आहे. सबब वरील प्रमाणे सक्सेशन सर्टीफीकेट मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे. त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार ही मयतांचे कायदेशीर वारस असल्या वाचत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सक्सेशन सर्टीफीकेट मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सवय या जाहीर प्रगटना व्दारे वरील सक्सेशन सटॉफिकेट देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप/उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बावतचे सक्सेशन सर्टीफीकेट प्रदान करण्यात येईल, सबच आज दिनांक २५/१२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : २४/१२/२०२६

**लिपीक, बिकाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड**

**आदेशावरुन सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय कन्नड**

## अग्रलेख...

# बुलेट ट्रेनचे स्वप्न साकारतेय...

लहानपणी मामाच्या गावाला जाण्यासाठी रेल्वे गाडीत बसल्यानंतर 'झुकझुक झुकझुक अगीन गाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या', हे गाणे म्हटल्याचे साऱ्यांनाच आठवत असेल. या गाण्यावर मराठी मुलखातील अनेक पिढ्यांचे बालपण सरले. अन्य प्रदेशांतही रेल्वेगाडीशी सांस्कृतिक बंध सांगणारी गाणी-कथा आहेत. काळ बराच पुढे सरकला. धुरांच्या रेषाही हवेत निघण्याचा काळ कधीच मागे सरला आहे. भारतात अद्ययावत रेल्वेगाड्यांचे युग अवतरते आहे. बुलेट ट्रेनने मामाच्या गावाला जाण्याचे दिवस आले आहेत. त्यासाठी सध्या तरी एकच अट आहे आणि ती म्हणजे तुमचा मामा मुंबई वा अहमदाबादला राहणारा असावा. बुलेट ट्रेनचे जे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दाखवले होते, ते आता प्रत्यक्षात येत आहे. देशातील पहिल्या मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२७ होणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नववर्षाच्या पहिल्या दिवशी केली, ही सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण होय. 'मोदी है तो मुमकीन है' असे म्हटले जाते. प्रत्यक्षात मोदी यांनी काय काय मुमकीन करून ठेवले, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. बुलेट ट्रेन आपल्या देशात धावू शकेल, याची कल्पनाही कोणी केली नव्हती इतका हा अफाट विकास आहे.

चीन, फ्रान्स, जपान, जर्मनीनंतर भारताचा बुलेट ट्रेन असलेल्या जगातील निवडक देशांच्या यादीत समावेश होत आहे, ही समस्त भारतीयांसाठी अतिशय अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. बंदुकीतून ज्या गतीने गोळी बाहेर पडते, त्या गतीने या गाड्या धावत असल्यामुळे त्यांना बुलेट ट्रेन म्हटले जात असावे. बुलेट ट्रेनने महाराष्ट्र आणि गुजरात यांना आणखी जवळ आणले आहे. या दोन राज्यांतील आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा नव्याने पाया घातला आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनसाठी आपल्याला जपानने तांत्रिक आणि आर्थिक मदत केली. जपानचे पंतप्रधान शिंजो ॲबे २०१५ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. तेव्हा देशात बुलेट ट्रेनचा पाया घातला गेला. २०२५ संपता-संपता त्यावर कळस चढला आहे. बुलेट ट्रेन बनवण्यासाठी अवाढव्य खर्च येतो, जो आपल्याला करणे अशक्य नसले तरी थोडे अडचणीचे झाले असते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी १ लाख ८ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. जपान आपल्या मदतीला धावून आला. जपानने यातील ८८ हजार कोटी रुपये ०.१ टक्का एवढ्या नाममात्र व्याजदरात देण्याची तयारी दर्शवली. या कर्जाची परतफेड आपल्याला ९०५०० कोटी रुपये एवढी करावी लागणार आहे. म्हणजे अधिकचे फक्त २५०० कोटी द्यावे लागणार आहेत आणि ते देखील ५० वर्षांत. देशात बुलेट ट्रेन धावायला लागून १५ वर्षे उलटतील तेव्हा ही परतफेड सुरू होईल. जगात जपानचे बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान सर्वांत सुरक्षित मानले जाते. यावरून आपण मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी जपानच्या तंत्रज्ञानाला पसंती का दिली, याची कल्पना येऊ शकते.

जगातील ईटीआर २०० नावाची पहिली बुलेट ट्रेन इटलीत १९३७ मध्ये धावली होती. या सुपरफास्ट गाडीची गती त्यावेळी ताशी ८० किमी होती. त्यानंतर १९६४ मध्ये जपानमध्ये पहिली बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावर सुरू करण्यात आली. ताशी १३० किमी ही या गाडीची तेव्हाची गती होती. भारतात सुरू होणाऱ्या बुलेट ट्रेनही गती ताशी ३२० किमी असेल. यावरून बुलेट ट्रेनच्या तंत्रज्ञानात काळानुरूप किती वेगाने बदल झाला आणि त्याला बुलेट ट्रेन का म्हणतात, याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. समाधानाची बाब म्हणजे भारतातील बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावरच आधारित आहे. नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून देशातील पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात जेवढा बदल आणि विकास मोदी यांच्या कार्यकाळात झाला, तेवढा याआधी एकाही सरकारच्या कार्यकाळात झाला नाही. मोदींच्या काळातच देशात वंदे भारत गाड्याही सुरू झाल्या. या गाड्या अतिशय कमी वेळात लोकप्रिय झाल्या. कारण वंदे भारतमधील डब्यांची नव्या तंत्रज्ञानाने केलेली बांधणी. वंदे भारतमध्ये बसल्यावर प्रवाशांना विमानात बसल्याचे समाधान मिळते. देशाच्या अनेक भागांत वंदे भारत धावत आहे. देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान गाडीला पंतप्रधान मोदी जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

मोदी सरकारने रेल्वे क्षेत्राचा कायापालट करून टाकला. अनेक रेल्वेस्थानकांचे अत्याधुनिकीकरण सुरू आहे. अनेक रेल्वेस्थानके विमानतळासारखी झाली आहेत. रेल्वेतून प्रवास करण्याला मोदी यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. २०१४ च्या आधी व त्यानंतरची रेल्वे प्रवासाची स्थिती पाहिली तर तीत आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्या लक्षात येईल. याला मोदींचे दूरदर्शी नेतृत्व जसे जबाबदार आहे, तसेच विद्यमान रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची धडाडीही कारणीभूत आहे. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा देणारे लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे संवेदनशील रेल्वेमंत्री या देशाने पाहिले आहेत. नव्या काळात रेल्वे अपघातच होऊ नयेत म्हणून पूर्ण क्षमतेने आणि खबरदारीने काम करणारे तसेच त्यासाठी कवचसारख्या नव्या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणारे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव लाभलेत, हे देशाचे भाग्यच म्हटले पाहिजे.

गेल्या दशकभरात रेल्वे गाड्यांतील स्वच्छता, गाड्या धावण्याचा वक्तशीरपणा, गाड्यांची वाढलेली गती, रेल्वेतील खानपानाच्या दर्जात झालेली सुधारणा आणि रेल्वे अपघातांची कमी झालेली संख्या यांचा आढावा घेतला तर मोदी सरकारने रेल्वेच्या क्षेत्रात काय काम केले, याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. देशात अनेक प्रकारच्या नव्या जलदगती गाड्या मागील अकरा वर्षांत सुरू झाल्या. या गाड्यांनी रेल्वे प्रवासाचा चेहरामोहरा बदलला. याआधी गाड्या अतिशय विलंबाने धावायच्या. याबाबतचा एक किस्सा अतिशय गाजला आहे. एक गाडी ठरल्यावेळेला रेल्वेस्थानकावर आली. राईट टाईम गाडी आल्याचा सर्वांनाच आनंद झाला, पण तो काही क्षणच टिकला. कारण ही गाडी राईट टाईम नव्हे तर २४ तासांच्या विलंबाने रेल्वेस्थानकावर आल्याचे नंतर स्पष्ट झाले. यातील गमतीचा भाग सोडला तरी असे दशकभरापूर्वी पर्यंत नेहमीच होत होते. जनतेनेही तशी स्वत:ची मानसिकता करून घेतली होती. या पृष्ठभूमीवर आपल्या देशात बुलेट ट्रेन सुरू होणे ही अतिशय मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. पहिल्या बुलेट ट्रेनच्या उद्घाटनानंतर मोदी सरकारने स्वस्थ बसू नये. महामार्गांच्या जाळ्याच्या धर्तीवर बुलेट ट्रेनचे जाळे उभारले जावे आणि त्यासाठी लगेच सुरुवात केली जावी. मोदी पंतप्रधान असल्यामुळे हे अशक्य नाही. अशक्य ते शक्य करून दाखवणे हीच मोदींची कार्यपद्धती आहे. मोदी फक्त स्वप्ने दाखवत नाहीत तर ती प्रत्यक्षात आणण्याचीही हमी देतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या लोकार्पणाची रीतसर घोषणा झाली आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, भारत सरकारमधील सर्व मंत्री आणि या प्रकल्पासाठी ज्यांचे-ज्यांचे हात लागले, त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. देर आए, दुरुस्त आए, असे म्हणतात. आपल्याला बुलेट ट्रेन सुरू करण्यास उशीर झाला, हे खरेच आहे. काँग्रेसच्या सरकारांनी या विषयात लक्ष घालण्यापेक्षा रेल्वे खात्याकडे मलिद्याचे खाते म्हणूनच पाहिले. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यावर रेल्वे क्षेत्राचाही विकास केला पाहिजे, असा विचार प्रथम आला आणि त्याची अंमलबजावणीही झाली. असंख्य आव्हाने असलेल्या भारतासारख्या महाकाय देशात बुलेट ट्रेन सुरू होतेय, हा फारच आनंदाचा विषय आहे. हा आनंद लवकरात लवकर समस्त देशवासीयांच्या वाट्याला येवो.


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# २०२६ वर्ष शहरी नक्षलीमुक्त व्हावं!

आपण २०२६ या नव्या वर्षात पदार्पण केले आहे. नव्या वर्षाचे नवे संकल्प असतात. मात्र बऱ्याचदा आरंभशूर म्हणून आपण संकल्प घेतो. ते पूर्ण करण्यासाठी आपण संघर्ष करतो, झटतो. मात्र दोन आठवड्यांतच आपला संकल्प मोडला जातो. हे वैयक्तिक संकल्पाबाबत घडते. त्यामुळे काही प्रमाणात आपले नुकसान होते. पण जेव्हा व्यापक संकल्प घेण्याची वेळ येते तेव्हा आरंभशूर होऊन चालत नाही. हजारो वर्षे ज्यू "नेक्स्ट इयर इन जेरुसलेम" म्हणत संकल्प घेत होते. त्यासाठी काही थेट वा गुप्त कृती होत असेल. पण हा संकल्प नित्यनेमाने पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत होता आणि एक दिवस खरोखर इस्रायल नावाचं राष्ट्र उभं राहिलं. त्याचप्रमाणे हिंदू देखील १९४७ पासून १४ ऑगस्टला अखंड भारतासाठी संकल्प घेतात. हा संकल्प कधी पूर्ण होईल याची शाश्वती आता देता येत नाही. ज्यूंची अवस्था तर आपल्यापेक्षा हजार पटींनी वाईट होती. तरी देखील त्यांचा संकल्प पूर्ण झाला. राम मंदिराचे उदाहरण घ्या. प्रत्येक हिंदूने संकल्प घेऊन पिढ्यान्‌पिढ्या तो जपून आज राम मंदिर उभे राहिले आहे. हे झाले व्यापक संकल्प. ज्यासाठी अनेक पिढ्या खर्च कराव्या लागतात. मात्र भारतात अनेक संकटे आहेत. ज्यांचा बंदोबस्त करणे शक्य आहे. त्यापैकी एक संकट म्हणजे शहरी नक्षलवाद.

विवेक अग्निहोत्री यांनी 'अर्बन नक्सल्स' नावाचे पुस्तक लिहिले आणि पाहता पाहता हा शब्द प्रचलित झाला. हा शब्द शहरातील बुद्धिजीवी, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांसाठी वापरण्यात आला आहे, यामध्ये हे लोक माओवादी विचारधारेचा प्रचार करतात, आंदोलने हायजॅक करतात आणि देशाच्या एकतेला आव्हान देतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च २०२५ मध्ये सांगितले होते की, नक्षलवाद जंगलातून तर संपत चालला आहे, पण शहरांमध्ये मुळे रोवत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी २०२५ च्या अखेरीस घोषणा केली की ३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त होईल. जंगलातील नक्षलवादावर सरकार उत्तम प्रकारे काम करत आहे. पण शहरी नक्षलवादावर स्वतंत्र लक्ष देण्याची गरज आहे. कारण हा व्हायरस युवकांचे ब्रेनवॉश करत आहे. आता कुलदीप सेंगरचं उदाहरण पाहू. कुलदीप सेंगर उत्तर प्रदेशातील उन्नाव जिल्ह्यातील एक प्रभावशाली राजकारणी. २००२ मध्ये बहुजन समाज पार्टी (बीएसपी) कडून, नंतर २००७ आणि २०१२ मध्ये समाजवादी पार्टी (एसपी) कडून आणि २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टी (बीजेपी) कडून विजयी झाला. उन्नाव भागात त्याचा मोठा प्रभाव होता, पण २०१७ मध्ये एका अल्पवयीन मुलीने त्याच्यावर बलात्काराचा आरोप केला. मुलीचा दावा होता की सेंगरने नोकरीचे आमिष दाखवून



तिचे अपहरण करून बलात्कार केला. प्रकरण आणखी गंभीर झाले जेव्हा पीडितेच्या वडिलांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला आणि कुटुंबावर हल्ले झाले. सीबीआय तपासात सेंगर दोषी ठरला. डिसेंबर २०१९ मध्ये दिल्लीच्या विशेष न्यायालयाने त्यांना आयपीसी आणि पोस्को कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मार्च २०२० मध्ये वडिलांच्या हत्येच्या प्रकरणात अतिरिक्त १० वर्षांची शिक्षा झाली. भाजपाने त्याला पक्षातून बडतर्फ केले.

२०२५ च्या शेवटी हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. २३ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगरच्या अपीलवर विचार करताना सशर्त जामीन मंजूर केला. पण २९ डिसेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली आणि सेंगरला तुरुंगातच राहावे लागले. आधीच्या निर्णयाविरोधात २८ डिसेंबर २०२५ रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवर मोठे आंदोलन झाले. या आंदोलनाचा मुख्य उद्देश होता सेंगरचा जामीन रद्द करणे, पीडितेची सुरक्षा वाढवणे आणि न्याय निश्चित करणे. वनडब्ल्यूएसहिंदी.कॉमने या आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारले. हा व्हिडीओ त्यांच्या चॅनेलवर अजूनही आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी आंदोलनाची दुसरी बाजू दाखवली नाही. पण काही सोशल मीडिया पोस्ट आणि वेबसाईट्स (जसे वनडब्ल्यूएसहिंदी.कॉम) यांनी दावा केला की येथे ब्राह्मणविरोधी आणि सनातन धर्मविरोधी घोषणा दिल्या गेल्या, जसे 'ब्राह्मणवाद से आजादी', 'हिंदुत्व से आजादी.' पत्रकाराने आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारला की, सेंगरविरोधातील आंदोलनात ब्राह्मण आणि हिंदुत्वाच्या विरोधात नारे का लावता? तर तिथे जमलेल्या मुलांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. गोदी मीडिया म्हणून त्याला हिणवले. बांगलादेशात ब्राह्मण आणि हिंदुत्व नाही मग तिथे कसे अत्याचार होत आहेत. याबाबतही मुलांना मतप्रदर्शन करता आले नाही. उलट ते जोरजोरात नारे देऊ लागले. हा सगळा प्रकार तुम्ही यांच्या वेबसाईटवर पाहू शकता.

दुसरे उदाहरण दिल्लीच्या इंडिया गेटवर प्रदूषणविरोधी आंदोलनात काही तरुणांनी माओवादी कमांडर माडवी हिडमाच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. 'माडवी हिडमा अमर रहे', 'जल-जंगल-जमीन की लड़ाई जिंदाबाद.' फलकही दाखवले गेले. पोलिसांनी २३ लोकांना अटक केली आणि डिसेंबर २०२५ मध्ये काहींना जामीन मिळाला. हिडमा छत्तीसगडच्या बस्तरमध्ये सीपीआय (माओइस्ट) चा कमांडर होता. त्याच्यावर २६ हल्ल्यांचा आरोप होता. मग या आंदोलनाचा आणि खून माओवादी नक्षली माडवी हिडमाचा काय संबंध? शाहीनबागचं आंदोलनही असंच हायजॅक झालं होतं ना? सीएए आणि एनआरसीवरनं उसळलेली दंगल आठवतच असेल तुम्हाला? भारतात सतत अशांतता पसरेल याची काळजी हे शहरी नक्षली घेत असतात. दुसरी गोष्ट आपली जेन झी पिढी यात ओढली जात आहे. यावर उपाय म्हणून सरकारने यात विशेष लक्ष घातलं पाहिजे. उगाच गरज नसताना ब्राह्मण या जातीवर चिखलफेक केल्यास त्यावर कठोर कारवाई व्हायला हवी. ब्राह्मण समाजातील एखादा दोष दाखवून द्वेष न करता तो दोष दूर करण्यासाठी काम करणे वेगळे आणि कुठे काहीही घडले तरी प्रत्येक वेळी ब्राह्मणवाद म्हणत त्या समाजाला बदनाम करणे वेगळे. हिंदू धर्माविरही गरज नसताना टीका केल्यावर कायद्यात तरतुदी करायला हव्यात. हिंदू धर्म हा सुधारणावादी धर्म आहे. मात्र केवळ बदनामी करण्यासाठी हिंदू धर्माला दूषणे लावले जात असतील तर हिंदूंचा एकमेव अधिकृत देश असलेल्या भारतामध्ये बहुसंख्य हिंदूंना न्याय मिळालाच पाहिजे. जगाला शांततेचा मार्ग दाखवणारा हिंदू समाज, जगभरात पसरून स्वकर्तृत्वावर मोठमोठ्या पदांवर विराजमान होणारा हिंदू समाज, इतरांना काफीर न मानता जिहाद न करता सर्वांप्रति प्रेमभाव दाखवणारा हिंदू समाज हा विश्वाच्या गळ्यातला मोतीहार आहे. केवळ हिंदू समाजासाठी हिंदूंचे संरक्षण करायचे नाही तर जगाच्या हितासाठी हिंदू संरक्षण करायचे आहे. २०२६ ला शहरी नक्षलमुक्त करण्यासाठी सरकार आणि समाजाला सजग राहावे लागेल. तरुणांना जागृत करावं लागेल. नक्षलविरोधी प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवावे लागणार आहेत. २०२६ या नववर्षांच्या सुरुवातीला चला शहरी नक्षलवादमुक्त भारत करण्याचा संकल्प घेऊया. कारण यामुळे भारत केवळ नक्षलमुक्त होणार नाही तर अधिक मजबूत होईल.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# २.३ टक्के क्षेत्रफळात १४७ कोटींचे वास्तव्य!

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. परंतु, भारताच्या वाट्याला आता फक्त २.३ टक्केच इतकाच भूभाग उरलेला आहे. अवघे ३२ लाख ८७ हजार २६३ वर्गकिलोमीटर इतके क्षेत्रफळ भारताकडे आहे. सर्वाधिक क्षेत्रफळ रशियाच्या वाट्याला आले असून या देशाकडे ११.५ टक्के इतका भूभाग आहे. परंतु, त्यांची लोकसंख्या अवघी १४ कोटींच्या आसपास आहे. भारत क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रमांकावर असला तरी आपली लोकसंख्या आज १४७ कोटींवर पोहोचली आहे. भारत तसा मूळ हिंदूंचा देश परंतु इतरांच्या तुलनेत जन्मदर दिवसेंदिवस कमी होत चालल्याने हिंदूंची लोकसंख्या ७८.९ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. जगातील अनेक देशांमध्ये आजही हिंदू धर्म पाळणाऱ्या नागरिकांचे वास्तव्य आहे. अखंड भारतात १० राष्ट्रांचा समावेश होता, असे सांगितले जाते. परंतु, हिंदूंचे साम्राज्य इंडोनेशियापर्यंत विस्तारले होते, ही बाब ध्यानात ठेवली पाहिजे. आज इंडोनेशियात हिंदू अवघा १.६८ टक्के इतकाच शेष असला तरी कधीकाळी हा संपूर्ण देशच हिंदूंचा होता. तेथील नागरिक आता मुस्लिम असले तरी आजही ते हिंदूंच्याच देवी-देवतांची पूजा करतात! टक्केवारीचा विचार केला तर जगात सर्वाधिक हिंदू नेपाळमध्ये राहतात. या देशात हिंदू धर्मीयांची टक्केवारी ८०.६ इतकी आहे. त्यानंतर मॉरिशस ४८.४ टक्के, फिजी २७.९, गयाना २४.९, भूतान २२.५, त्रिनिदाद आणि टोबॅगो २२.३, कतार १५.९ आणि श्रीलंकेत १३.७ टक्के हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. तसेच अन्य अनेक देशांमध्ये हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानातही काही प्रमाणात हिंदू राहतात. परंतु, त्यांच्यावर वारंवार अत्याचार होत असल्याने तिथे राहणाऱ्या हिंदूंना नाईलाजाने धर्मांतरण करावे लागत आहे. अशाही परिस्थितीत हिंदू धर्म लोकसंख्येच्या बाबतीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाला असून हिंदू धर्मात शिक्षणाचे प्रमाण ज्या गतीने वाढले त्याच गतीने जन्मदर कमी झाला आहे. परंतु, मुस्लिम समाजात जन्मदर प्रचंड आहे. आगामी २५ वर्षांत मुस्लिम धर्मीयांची संख्या ३५ टक्क्यांवर जाण्याची शक्यता असून भविष्यात हिंदू आपल्याच भूमीत अल्पसंख्यक होण्याचा धोका आहे. अनेकदा भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी पुढे येते. परंतु, भारत मूळ हिंदूंचेच राष्ट्र असल्याने अशा घोषणेची गरज नसल्याचे विचारवंतांनी स्पष्ट केलेले आहे.

लोकसंख्यावाढीमुळे बेरोजगारांची संख्यासुद्धा झपाट्याने वाढत आहे. परंतु, सरकारने तरुणाईच्या कौशल्याचा वापर करून घेण्यासाठी विविध योजना अंमलात आणल्याने देशाच्या आर्थिक प्रगतीत मोठी भर पडत आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या आसपास आहे आणि आर्थिक प्रगतीचा वेग जगात सर्वाधिक असल्याने २०५० पर्यंत भारत ३० ट्रिलियन डॉलर्सचा आकडा ओलांडून जगात दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता म्हणून उदयास येईल, असा अंदाज पीडब्ल्यूसी या ब्रिटिश कंपनीने नुकताच वर्तविला आहे. भविष्यात भारत अमेरिकेला मागे टाकून चीनवर वरचढ ठरेल, हे खरे असले तरी भारतात लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी कोणताही ठोस कायदा नाही. भविष्यात ज्या गतीने भारतीय अर्थव्यवस्था वाढेल, त्याच गतीने लोकसंख्यासुद्धा वाढणार आहे. विशेष म्हणजे, आपल्याकडे लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी जनजागृती आणि उपाययोजनांवर भर दिला जातो. याचा परिणाम म्हणून हिंदूंचा जन्मदर घटला आहे. परंतु, त्या तुलनेत मुस्लिमांमध्ये जागृती येऊ शकलेली नाही. शिवाय काही राजकीय पक्ष मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करतात. वास्तविक संपूर्ण जगात सर्वांत सुरक्षित भारतातील मुस्लिमच आहेत. कारण, बहुतांश मुस्लिम राष्ट्रांमध्ये अनेक मुस्लिम रोज पंथवाद अथवा अन्य कारणांमुळे मारले जातात. भारतात मात्र मुस्लिमांना उच्च पदे आणि बरोबरीचे अधिकार प्राप्त आहेत. तरीही केवळ खुर्चीच्या राजकारणासाठी मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करून या समाजाची मते लाटण्याचा गोरखधंदा वर्षानुवर्षे चालत आलेला आहे. संसाधने आणि क्षेत्रफळाची मर्यादा लक्षात घेता लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी मुस्लिमांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून आता विरोधकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा तुमचे मुस्लिमप्रेम केवळ राजसत्तेपुरते मर्यादित आहे, हेच सिद्ध होईल.

९८८१७१६०२७

### सूचना

दररोज संपादकीय पानावर प्रसिद्ध होणारे 'आजचे संघगीत' हे सदर तात्पुरते स्थगित करीत आहोत. लवकरच ते नव्या स्वरूपात सुरू होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

-संपादक

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# पूजा मोरे प्रकरण : हिंदुत्ववाद्यांचा धडा

पूजा मोरे-जाधव यांच्या उमेदवारीभोवती उभा राहिलेला वाद हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, तो महाराष्ट्रातील वैचारिक राजकारणाच्या खोल पातळीवरचा संघर्ष अधोरेखित करणारा आहे. या प्रकरणामुळे एक कठोर वास्तव पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. हिंदुत्वाच्या राजकारणात वैचारिक सातत्याला अत्यंत महत्त्व आहे आणि संधिसाधू बदलांना माफी दिली जात नाही. विशेषतः राष्ट्रीय विचारांवर चालणाऱ्या कट्टर हिंदुत्ववाद्यांकडून अशा विसंगतीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता जवळपास धूसरच म्हणावी लागेल. हिंदुत्ववादी तसे आक्रमक नव्हते आणि नाहीत. मात्र, आता आता अलिकडे त्यांच्याही सहनशीलतेचा बांध फुटू लागला असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

पूजा मोरे यांना ज्या प्रकारचा विरोध सहन करावा लागला, तो केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो राजकीय निर्णयांवर थेट परिणाम करणारा ठरला. काही दिवसांतच वाढलेले ट्रोलिंग, जुने व्हिडीओ, विधानांचे संदर्भ आणि छायाचित्रे पुन्हा पुन्हा समोर आणत त्यांची वैचारिक विश्वासार्हता प्रश्नांकित करण्यात आली. अखेरीस, या दबावापुढे त्यांना पुणे महानगरपालिका निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. नव्हे तर तसे करण्यास हिंदुत्ववाद्यांनी भाग पाडले. या अर्थाने हिंदुत्ववादी संघटनांनी एक स्पष्ट संदेश दिला□भूतकाळ पुसून टाकता येत नाही आणि राजकीय स्मृती फार तीक्ष्ण असतात.

पूजा मोरे स्वत:चा राजकीय प्रवास तळागाळातील संघर्ष, शेतकरी आंदोलन, मराठा आरक्षण चळवळ आणि सामाजिक प्रश्नांशी जोडून सांगतात. त्यांचा संघर्ष नाकारता येण्यासारखा नाही. मात्र, आजच्या काळात केवळ संघर्षाची कथा पुरेशी ठरत नाही. आजचे राजकारण अति-डिजिटल झाले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येक वक्तव्य, प्रत्येक फोटो आणि प्रत्येक कृती कायमची नोंद बनते. एखाद्या उमेदवाराचा भूतकाळ आजच्या भूमिकेशी विसंगत वाटल्यास, त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटते□आणि पूजा मोरे प्रकरणात नेमके तेच घडले. मराठा आरक्षण आंदोलनातील सहभाग, आंदोलनादरम्यान केलेल्या कथित वक्तव्यांबाबतचे आरोप, तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंधित व्हायरल व्हिडीओ यामुळे हिंदुत्ववाद्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. जरी पूजा मोरे यांनी हे व्हिडीओ तोडमोड करून व्हायरल केल्याचा दावा केला असला, तरी राजकारणात 'स्पष्टीकरण' अनेकदा 'नुकसान' भरून काढू शकत नाही, हे वास्तव आहे.

याहून अधिक वादग्रस्त ठरले ते त्यांचे शहरात आल्यानंतर मला हिंदुत्व समजले हे विधान. हिंदुत्ववादी संघटनांच्या दृष्टीने हिंदुत्व हे परिस्थितीनुसार स्वीकारले जाणारे राजकीय लेबल नाही, तर संस्कार, विचार आणि जीवनपद्धतीशी जोडलेले मूल्य आहे. त्यामुळे विवाह, स्थलांतर किंवा राजकीय संधीमुळे हिंदुत्व स्वीकारल्याचा दावा अनेकांना अस्वस्थ करणारा ठरला. त्यांच्या कथनातील ही वैचारिक दरीच त्यांच्या नकाराचे मुख्य कारण बनली. शिवाय विरोधावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, त्याचवेळी मराठा आंदोलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उद्देशून "आरक्षण मागतोय् बायको नाही..." अशी घोषणा याच पूजा मोरे-जाधव या महिलेने दिली. हे तर फारच निषेधार्ह आहे. हिंदुत्व शहरात आल्यानंतर कळलं किंवा नसेल कळलं. पण महिलांचा आदर करणं ही संस्कृती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कळत नाही, असे सुचवायचे होते की काय मोरे बाईंना? या संपूर्ण प्रकरणाकडे भाजपाने केवळ वैयक्तिक प्रकरण म्हणून पाहणे देखील धोकादायक ठरले. मोरे प्रकरण हा भाजपासाठीसुद्धा गंभीर इशारा आहे. अलिकडे पक्षात प्रवेश केलेल्या उमेदवारांना केवळ निवडणुकीतील गणित पाहून उमेदवारी देणे, त्यांच्या वैचारिक पृष्ठभूमीचा सखोल अभ्यास न करता पुढे आणणे, ही रणनीती पक्षालादेखील अडचणीत आणू शकते. भाजपाची ओळख ही नेहमीच कॅडर-आधारित संघटनात्मक रचना, दीर्घकालीन निष्ठा आणि वैचारिकता यावर उभी राहिली आहे. जेव्हा ही रचना डावलून 'बाहेरून आलेल्या' उमेदवारांना संधी दिली जाते, तेव्हा पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. पूजा मोरे प्रकरणात हेच घडले. पक्षाने उमेदवारी दिली असली, तरी ती स्वीकारण्यास तयार असलेला वैचारिक आधार तितक्याच ताकदीने उभा राहिला नाही.□

या घटनेतून आजच्या राजकारणातील एक मूलभूत सत्य पुन्हा अधोरेखित होते□सोशल मीडिया कधीच विसरत नाही. कधी कधी निवडणूक पराभवापेक्षाही अधिक वेदनादायक. पूजा मोरे स्वत:ला संघर्ष करणारी कार्यकर्ती मानत पुढे लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेत असल्या, तरी या प्रकरणातून दिला गेलेला राजकीय धडा स्पष्ट आहे. तो केवळ त्यांच्यासाठी नाही, तर त्यांना उमेदवारी देणाऱ्या पक्षासाठी आणि भविष्यातील इतर इच्छुक उमेदवारांसाठीही आहे. शेवटी, पूजा मोरे प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या राजकीय अपयशाचे उदाहरण नाही, तर वैचारिक राजकारणात शॉर्टकट महागात पडतात, याची ठळक आठवण करून देणारे प्रकरण आहे. आता प्रश्न इतकाच आहे□भाजपाने या घटनेतून योग्य धडा घेतला आहे का? कारण वैचारिक प्रवास अपूर्ण असलेल्या व्यक्तींना दिलेली संधी पक्षालाही तितक्याच तीव्रतेने भोवू शकते. यात शंका नाही.

राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र आणि पंजाब (शीख परंपरा) या चारही प्रदेशांनी मुस्लिम आक्रमणांच्या काळात केवळ राजकीय संघर्षच केला नाही, तर हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या धैर्याने उभे राहिले. सातत्याने झालेल्या आक्रमणांमुळे देशाची सांस्कृतिक ओळख पुसली जाण्याचा धोका निर्माण झाला होता. अशा काळात या प्रदेशांनी आपली श्रद्धा, जीवनमूल्ये आणि सामाजिक रचना टिकवून ठेवली. विशेषतः मराठ्यांनी अखिल भारतातून मुस्लिम सत्तेची पाळेमुळे खणून काढण्यात जे यश मिळवले, त्यामागे त्यांचा प्रारंभापासूनचा ठाम संकल्प कारणीभूत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय लहान वयातच 'हिंदवी स्वराज्य' या महान ध्येयाची कल्पना मनात बाळगली होती. पंधराव्या वर्षीच त्यांनी परकीय सत्तेपासून मुक्त, स्वाभिमानी आणि धर्मनिष्ठ राज्याचे स्वप्न पाहिले. हे स्वप्न केवळ राजसत्तेपुरते मर्यादित नव्हते, तर ते सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्याशी जोडलेले होते. आणि पूजा मोरे ज्या समाजातून येतात, तेव्हा त्यांना, सांस्कृतिक व वैचारिक अर्थाने विचार केला, तर छत्रपतींचे वारस म्हणणे चुकीचे ठरणार नाही. अशा वारसांनीच जर महाराजांच्याच स्वप्नांना सुरुंग लावणारी कृती केली तर, महाराजांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखं आहे. अशा पवित्र आणि बलिदानांनी नटलेल्या भूमीत हिंदुत्वाविरोधात बोलणे किंवा हिंदू संस्कृतीविरुद्ध वातावरण निर्माण करणे हे स्वाभाविकच असह्य आणि अस्वीकार्ह ठरते. कारण ही भूमी संघर्ष, त्याग आणि आत्मसन्मानाची साक्ष देणारी आहे. इतिहासाने शिकवलेला हा वारसा जपणे, त्यातून एकात्मता आणि स्वाभिमान टिकवणे हे आजच्या पिढीचे कर्तव्य आहे. पूजा मोरे प्रकरणातून हिंदुत्ववाद्यांनी दिलेला हा इशारा सातत्यानं हिंदू धर्माचा उपहास करणाऱ्या काँग्रेस आणि अलिकडेच धर्मनिरपेक्षतेचा उमाळा आलेल्या उबाठासाठीदेखील एक धडा आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' उत्कृष्ट अग्रलेख

१ जानेवारीचा 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' हा अग्रलेख वाचला. गेल्या कित्येक दिवसांत असा घणाघाती अग्रलेख वाचला नव्हता. त्यातील शब्दन्‌शब्द म्हणजे वाघनखे आहेत. संबंधितांचा कोथळा बाहेर काढणारी. हे संबंधित म्हणजे सर्व पक्षांचे कार्यकर्ते, नेते होत. आपण कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. ना सत्ताधाऱ्यांचा ना विरोधकांचा. अग्रलेखातील वाक्यन्‌वाक्य सत्य आहे. इतके सत्य लिहायला रामशास्त्री बाण्याची निर्भयता लागते. भाऊराव माडखोलकर आणि आचार्य अत्र्यांना या अग्रलेखाने जणू पोचपावती दिली. ज्या कोणी हा अग्रलेख लिहिला असेल त्याचे त्रिवार अभिनंदन.

**डॉ. वि. स. जोग**/नागपूर

### कुऱ्हाडीला धार केली का?

गोविंद नावाचा एक लाकूडतोड्या होता. तो मागील पाच वर्षांपासून एकाच ठेकेदाराकडे काम करीत होता. परंतु त्याचा पगार वाढत नव्हता. परंतु त्याच वेळी अवघ्या वर्षभरापूर्वी कामावर नव्याने रुजू झालेल्या रवीचा पगार मात्र वाढला. गोविंदने याबाबत विचारणा केली असता त्याला सांगितले गेले की, तो ५ वर्षांपूर्वी जेवढी लाकडे तोडायचा तेवढीच तो आताही तोडून देत आहे. त्यामुळे पगार देखील तितकाच आहे. जर लाकडे तोडण्याच्या संख्येत वाढ झाली तर पगार देखील वाढेल.

गोविंद हे ऐकून अधिक मेहनत करायला लागला. जास्त वेळ काम करूनही लाकडांच्या संख्येत अपेक्षित ती वाढ होईना. तेव्हा ठेकेदाराने त्याला रवीकडे जायला सांगितले. कदाचित तो उपाय सांगू शकेल. गोविंदने रवीला जेव्हा कारण विचारले तेव्हा रवी म्हणाला, "मी प्रत्येक लाकूड कापून झाल्यावर दोन मिनिटे आराम करतो व आपल्या कुऱ्हाडीला धार करतो. त्याने पुढील लाकूड देखील कमी कष्टात तोडले जाते. तू आपल्या कुऱ्हाडीला शेवटची धार केव्हा केली होती?" गोविंदला कळून चुकले की त्याच्या प्रामाणिक कष्टात कुठे चूक होती. जी गोष्ट कुऱ्हाडीला धार लावण्याची तीच गोष्ट देवाने माणसाला दिलेल्या बुद्धीची, तिलाही लिहिण्या-वाचनाने, अभ्यासाने, चांगल्या परिवाराशी जोडण्याने आणि मुख्य म्हणजे भगवत् भक्तीने बुद्धीला धार लावण्याची गरज आहे. प. पू. पांडुरंग शास्त्री सांगतात, भक्ती ही सामाजिक शक्ती आहे. खरेच आहे, सर्वांनी विचार केला पाहिजे की आम्ही आपल्यातील अंगभूत वैशिष्ट्यांना कुऱ्हाडीसारखी शेवटची धार केव्हा केली होती. जुने कर्तृत्व, कार्य हे फार दीर्घकाळ आपला साथ देत नाही. आपल्याला वारंवार त्याला धार करावी लागते.

**मधुकर व्यवहारे**/पुणे

### बिबट्यांचा वावर, एक गंभीर समस्या

अलिकडच्या काळात बिबट्यांचे मानवी वस्त्यांमध्ये दर्शन अगदी नित्याची बाब होऊन बसली आहे. पुणे येथील केशवनगर परिसर, नागपूरमधील पारडी, तसेच मुंबईमधील भाईंदर परिसरातील बिबट्याचा वावर खरोखरीच चकित करणारा तर आहेच, शिवाय या विषयावर मंथन करायला लावणाराही आहे. नैसर्गिकत: बिबट्या हा लाजाळू प्राणी आहे. परंतु मानवी भागात शिरल्यावर गोंधळल्यामुळे तो स्वसंरक्षणार्थ हल्ला करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. वन्यजीव-मानव संघर्ष वाढतो आहे. पण हे सगळे का होत आहे, याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात सहा व्याघ्र प्रकल्प आणि १४ वन्यजीव अभयारण्ये आहेत, ज्याचे क्षेत्रफळ जवळपास चौरस किलोमीटर, ज्यात ३९५१.०२ चौ. किमी कोअर एरिया आणि ५१६५.७८ चौ. किमी बफर एरिया म्हणून नोटिफाईड आहे. (आकडेवारी २०१९ ची आहे) या बाबतीत कार्यालय महालेखाकार, लेखा परीक्षा (द्वितीय), महाराष्ट्र, नागपूरने एक अहवाल, वर्ष २०१९ मध्ये 'टायगर रेस्क्यू इन महाराष्ट्र' या मथळ्याखाली प्रसिद्ध केला, ज्यात अगदी सखोल अभ्यास करून विश्लेषणात्मक माहिती आहे. या अहवालात प्रामुख्याने विशद केले आहे की, कोअर अधिवासात मानवी वस्ती आणि टुरिस्ट फॅसिलिटीज वन्यजीवांच्या अधिवासाला मर्यादित करतात, तसेच त्यांच्या इनव्हायोलेट स्पेसमध्ये अतिक्रमण केले जात आहे. त्यांच्या अधिवासात मानवाचे अतिक्रमण ही एक चिंतेची बाब आहे. जंगल तोडीवर शासनाने आज काही प्रमाणात का होईना नियंत्रण आणले असले तरी या जंगलतोड वन्यजीवांना नागरी वस्त्यांकडे वळवीत आहे. मर्यादित जंगल आणि त्या प्रमाणात बिबट्यांची असलेली संख्या, शिकारीची कमतरता वन्यजीवांना मानवी वस्त्यांकडे पलायन करायला भाग पाडत आहे.

शासनाने ही समस्या गंभीरतेने घेऊन योग्य त्या उपाययोजना करायला हव्यात. जसे- वन्यजीवांच्या हालचालींवर नियंत्रण आणि योग्य देखरेख आणि त्याकरिता लागणाऱ्या मनुष्यबळाची पर्याप्त उपलब्धता तसेच मूल्यमापन, बंदी, जंगलातील मानवी वसाहती आणि पर्यटनासाठी असलेल्या अवास्तव सुविधा टप्प्याटप्प्याने बंद करणे, मानवी वसाहतींचे योग्य जागेवर स्थलांतर करून त्यांचे पुनर्वसन करणे इत्यादी. अन्यथा निष्पाप नागरिक वन्यजीवांच्या भक्ष्यस्थानी पडतील आणि मग मात्र हा प्रश्न सोडविणे अशक्य होऊन बसेल आणि सामान्यांचे जीवन मात्र पणाला लागेल, एवढे निश्चित.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मनपा निवडणूका : १६ प्रभागात ६५ जागांकरीता ४११ उमेदवार रिंगणात :

**परभणी / प्रतिनिधी** - महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत एकूण १६ प्रभागात ६५ जागांकरीता प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह अन्य पक्ष व अपक्ष असे एकूण ४११ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. छाननी प्रक्रियेतून ६०८ उमेदवारांची अर्ज वैध ठरले होते. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीपर्यंत म्हणजे आज शुक्रवार २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत एकूण १९७ उमेदवारांनी रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे या १६ प्रभागातील एकूण ६५ जागांकरीता लढतीचं चित्र स्पष्ट झालं आहे.

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधून २२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १० उमेदवारांनी रिंगणातून माघार घेतली त्यामुळे निवडणूक रिंगणात आता १२ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक २ मधून २६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी ९ उमेदवारांनी माघार घेतली, आता १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ३ मधून ३७ अर्ज वैध ठरले, १६ उमेदवारांनी माघार घेतली, आता २१ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ४ मधून ३७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी १० उमेदवारांनी माघार घेतली, आता २७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ५ मधून २६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी ४ उमेदवारांनी माघार घेतली, आता २२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ६ मधून ४७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी २३ उमेदवारांनी माघार घेतली, आता २४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

प्रभाग क्रमांक ७ मधून ४५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी १७ उमेदवारांनी माघार घेतली, आता २८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ८ मधून ३४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी १५ उमेदवारांनी माघार घेतली, आता १९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ९ मधून ३५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी १३ उमेदवारांनी माघार घेतली, आता २२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १० मधून ३६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी १० उमेदवारांनी माघार घेतली, आता २६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ११ मधून ३० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, त्यापैकी ८ उमेदवारांनी माघार घेतली, आता २२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

### महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भरारी पथकांची बैठक

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिका सार्वजनिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज शुक्रवार जानेवारी रोजी भरारी पथकांची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने भरारी पथकांना सविस्तर सूचना व मार्गदर्शन केले.

या बैठकीस निवडणूक अधिकारी तथा नितीन नार्वे कर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, नगरपालिका प्रशासन विभाग प्रमुख महेश गायकवाड, तहसीलदार संदीप राजापुरे, मुख्यालयाचे परीक्षक श्रीरंग भुतडा आणि कोषागार अधिकारी दत्ता भांगे उपस्थित होते. या बैठकीत निवडणूक अधिकारी तथा नितीन नार्वेकर आणि उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी भरारी पथकांना सविस्तर सूचना व मार्गदर्शन केले. प्रत्येक भरारी पथकाने आपल्या कार्यक्षेत्रातील पाच उपपथकांच्या माध्यमातून सभा, रॅली तसेच वाहन वापरासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत की नाही, याची काटेकोर पाहणी करावी, असे निर्देश देण्यात आले.

तसेच उमेदवारांच्या सभा, रॅली, प्रचार घोषणाबाजी, वर्तमानपत्रातील बातम्या तसेच मीडिया व प्रसारमाध्यमांमधील जाहिरातींची रोजच्या रोज तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले. निवडणुकीदरम्यान पैसा, दारू अथवा अन्य प्रलोभनांचे वाटप केल्याचे आढळल्यास तत्काळ पंचनामा करून कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट करण्यात आले. सभा व रॅलीसाठी आवश्यक सर्व परवाने 'एक खिडकी योजना' घेतले आहेत की नाही, याची माहिती भरारी पथकांनी घ्यावी. तसेच एसीसी पथकाच्या माध्यमातून प्रचार बंद झाल्यानंतर तास सतर्क राहून नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या ठिकाणी सभा होईल, त्या ठिकाणी भरारी पथकाने प्रत्यक्ष जाऊन व्हिडिओ चित्रीकरण करून ते भरारी पथकाच्या प्रमुखाकडे सादर करावे, असेही सांगण्यात आले. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच निवडणूक उमेदवारांच्या खर्चाचा अहवाल लेखा अधिकाऱ्यांकडे वेळेत सादर करावा. निवडणूक खर्चाची मर्यादा लाख रुपयांपर्यंत असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत कापूस-सोयाबीन जळून खाक

**सेलू,/प्रतिनिधी :** तालुक्यातील धनेगाव येथे गुरुवारी (दि. १) रात्री शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत शेतआखाड्यावर बांधलेली बैलजोडी आगीत होरपळून मृत्युमुखी पडली असून, शेतकऱ्याचे कापूस व सोयाबीन पिकासह मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकरी कुटुंबावर संकट ओढावले आहे.

धनेगाव शिवारातील गट क्रमांक १४१ मधील शेतकरी रामभाऊ देविदासराव कटारे यांच्या शेतआखाड्यावर गुरुवारी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीचे स्वरूप अत्यंत भीषण असल्याने आखाड्यावर बांधलेली एक बैलजोडी आगीत होरपळून मृत्युमुखी पडली.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# खेळातून मन आणि मनगट मजबूत होते- आ. गुट्टे

## फरकंडा येथे श्री बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सवाचे उदघाटन

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांच्या विकासात अभ्यासा सोबतच खेळाचे अत्यंत महत्त्व आहे .अभ्यासाने विद्यार्थ्यांचा मेंदू सक्षम होतो. त्याचप्रमाणे खेळ जीवनात आवश्यक आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांचे मन आणि मनगट मजबूत होते.राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण खेळांचे केलेले जतन ऐतिहासिक आहे . प्रतिपादन गंगाखेडचे आ . रत्नाकर गुट्टे यांनी दि २ रोजी केले.

ते तालुक्यातील फरकंडा येथील जय क्रांती हायस्कूलमध्ये श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर आयोजित ४० व्या श्री बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सव २०२६ चे उद्घाटन करताना बोलत होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बळीराजा परिवराचे अध्यक्ष तुषारभैय्या गोळेगावकर हे होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिप सभापती श्रीमती चित्राताई गोळेगावकर, उपाध्यक्ष योगीराज गोळेगावकर, संचालक सौ अक्षयाताई गोळेगावकर , कोषाध्यक्ष दिलीपराव दुधाटे, सौ प्रेमाताई कदम, माजी नगराध्यक्ष वसंत सिरस्कर, मा. सभापती रत्नाकर शिंदे,नगराध्यक्ष प्रतिनिधी इमदाद पठाण, गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत, उपनगराध्यक्ष भास्करराव सिरस्कर,जालींदर हत्तीअंबीरे, श्रीकांत गायकवाड ,सरपंच सौ. शोभाबाई जोंधळे, उपसरपंच कौशल्याबाई



पौळ, संदीप आळनुरे यांची प्रमुख उपस्थिती होती . पुढे बोलताना आ . गुट्टे म्हणाले की,देशाच्या विकासात विद्यार्थ्यां महत्वाचं घटक असतो . त्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे असते त्यासाठी खेळ महत्त्वाचा आहे. त्यांना मोबाईल पासून दूर करून मैदानावर खेळविण्यासाठी बळीराजा परिवाराचा प्रयत्न स्तुत्य आहे . कार्यक्रमाचे प्रारंभी बालाजी विद्यालय इसाद यांनी पथसंचलन करून मानवंदना दिली . यावेळी पाहुण्यांसमोर पारंपरिक खेळाचे प्रात्याक्षिक विद्यार्थांनी दाखविले . हा महोत्सव पाच जानेवारी पर्यंत चालणार आहे . या त लुप्त होणाऱ्या खेळांचे प्रदर्शन आयोजित केले जाते . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुअ दिगांबर दुधाटे यांनी तर सूत्रसंचालन रंगनाथ सुपेकर,गोपाळ गुरमे यांनी तर आभार प्रदर्शन नारायण चव्हाण यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बळीराजा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गिरीश सोळंखे, प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे,माजी प्राचार्य डॉ.एच.टी.सातपुते यांच्यासह स्थानिक संचालक मंडळ,बळीराजा परिवारातील सर्व मुख्याध्यपक, क्रीडा शिक्षक यांनी परिश्रम घेतले .




### सावित्रीबाई फुले : सामाजिक क्रांतीच्या जननी''- प्रा. काकडे

**मानवत / प्रतिनिधी** - दि.३/१/२६ रोजी. के. के. एम महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हूणन प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे, उपप्राचार्य डॉ. के. जी हुगे, पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे, प्रा अशोक काकडे,मुल्यशिकण समिती प्रमुख डॉ. पंडित मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हूणन प्रा अशोक काकडे उपस्थित होते. ते मार्गदर्शन करतांना म्हणाले की सावित्रीबाई फुले या भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. या दोघांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली.एवढेच नाही तर त्यांनी महिलांच्या विकासात बाधा येणाऱ्या अनिष्ठ रूढी परंपरा बंद करण्यासाठी प्रयत्न केले. असे ते म्हणाले.

## जिंतूर शहराचा सर्वांगीण विकास हाच ध्यास- नगराध्यक्ष देशमुख

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर माझ्यावर नागरिकांनी व नगरसेवकांनी जो विश्वास टाकला आहे, त्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे व कटिबद्धतेने काम करणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख यांनी केले. दिनांक २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पदग्रहण सोहळ्यासाठी कार्यक्रमाला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमेश ढाकणे, उपमुख्याधिकारी अनिल समिंद्रे,माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वसंतराव शिंदे,भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे, डॉ. पंडित दराडे, रमण तोष्णीवाल, यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक,पदाधिकारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रतापराव देशमुख म्हणाले की, सन २००७-०८ मध्ये नगराध्यक्ष असताना शहराच्या विकासासाठी अपेक्षित



संधी मिळू शकल्या नाहीत. मात्र, यावेळी जिंतूर शहराच्या विकासाला नवी दिशा देण्याचा ठाम निर्धार केला आहे. शहराची ओळख असलेल्या बान (उलटी) नदीच्या साफसफाई व सुशोभीकरणाच्या कामास सुरुवात करण्यात आली असून, हे काम अधिक व्यापक स्वरूपात राबवले जाणार आहे. शहरात सध्या भुयारी गटार योजना,धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून धुळे मुक्त शहर करण्याचा निर्धार यावेळी केल मात्र ही कामे पूर्ण झाल्यानंतर जिंतूर शहर अधिक स्वच्छ,सुसज्ज व नियोजनबद्ध स्वरूपात उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंदू-मुस्लिम धार्मिक स्थळांचा समतोल विकास करून सामाजिक सलोखा जपण्यावर भर दिला जाईल.पक्षपात न करता शहरातील सर्व प्रभागांमध्ये समान न्यायाने विकासकामे केली जातील. विशेषतः मुस्लिम समाजाने माझ्यावर मोठा विश्वास दाखवला असून, त्या विश्वासाला तडा जाऊ न देता सर्व समाजघटकांच्या हिताचे निर्णय घेतले जातील,असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था विस्कळीत झालेली असून, त्याचे शास्त्रशुद्ध नियोजन करून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यात येईल. नगरपरिषदेतील सर्व २५ नगरसेवक हे माझे कुटुंब असून, सर्वांना सोबत घेऊन शहराचा विकास साधला जाईल, असे त्यांनी नमूद केले. आदरणीय राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली शहरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. रखडलेल्या रस्त्यांसाठी निधी आणून पक्के व दर्जेदार रस्ते तयार केले जातील. तसेच युवकांसाठी क्रिकेट व इतर खेळांसाठी क्रीडा संकुल, सांस्कृतिक उपक्रमांसाठी नाट्यगृह उभारण्याचेही नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास गट नेते सचीन उर्फ मुन्ना गोरेनवनिर्वाचित नगरसेवक गोपाळ रोकडे,पिंटू चव्हाण, संदीप लकडे, टीकाखान पठाण, योगेश काशीकर, राजेश राठोड, मुन्ना कुरेशी, दत्ता काळे, फिरोज कुरेशी, किशोर जाधव, याहीया बेग, मोहम्मद अथर, प्रदीप चौधरी, शहेजादखान पठाण, कल्याण देशमुख, विलास भंडारी,मोहसीनखान पठाण, प्रदीप कोकडवार,राहुल देशमुख, बंटी निकाळजे, गणेश कुन्हे, रहमान भाई, शोएब जानिमिया, यांचे सह भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजीज जानिमिया यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ पंडित दराडे यांनी मांडले.

## धनगर समाजाला तुम्ही दिलेला शब्द पाळला नाही- बोराडे

**पालम,/प्रतिनिधी:** धनगर समाजाला एसटी प्रवर्गामध्ये समावेश करण्याचा शब्द देऊनही अद्याप या सरकारने पाळलेला नाही यामुळे सरकारने समाजाची दिशाभूल करण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन समाजाचे नेते दीपक बोराडे यांनी पालम येथील दि, १ रोजी समाज बांधवांनी आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमाप्रसंगी बोलताना व्यक्त केले, यावेळी व्यासपीठावर तालुक्यातील समाज बाधव उपस्थिती होती.

समाजाचे नेते दीपक बोराडे यांचे पालम शहरांमध्ये समाज बांधवांच्या वतीने भव्य ढोल ताशाच्या गजरामध्ये जेसीबीच्या साह्याने फुलांची उधळण करत भव्य असे स्वागत करण्यात आले, त्यानंतर समाज बांधवांनी आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारोह कार्यक्रमाला त्यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना दीपक बोराडे




म्हणाले की राज्यातील विविध सरकारने समाजाची दिशाभूल करून निवडणुकीच्या काळामध्ये मताचा वापर करून समाजाला फसविण्याचे काम करण्यात आले आहे, आरक्षण लढ्यामध्ये अनेक समाज बांधवांनी आपली जीवाची आहुती देऊनही या सरकारला अद्याप जाग आलेला नाही, सरकार वेळोवेळी समाजाला फसविण्याचे काम करीत असले तरीही समाज यापुढे फसणार नसून समाजाचे हक्काचे आरक्षण आहे, तेच मिळण्यासाठी येणाऱ्या दि २१ जानेवारी रोजी समाजाचे पिवळे वादळ मुंबई येथे लाखोच्या संख्येने धडकणार आहे, समाज बांधव मुंबई येण्याच्या अगोदरच समाजाचे हक्काचे आरक्षण समाजाला देण्याचे काम सरकारने करावे अन्यथा येणाऱ्या काळात राज्यकर्त्याला याचा परिणाम भोगावा लागेल असे प्रतिपादन सत्कार समारंभ कार्यक्रम प्रसंगी बोराडे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजा बाधवाणी प्रयत्न केले.

### परभणी आगाराची - पाळोदी मार्गे नवीस बस सुरु करा- आ.राजेश विटेकर यांच्याकडे मागणी

**महेश दिशागत**

**मानवत,/प्रतिनिधी:** परभणी आगाराची परभणी - पाळोदी मार्गे - पाथरी या मार्गे नवीन बस फेरी चालू करावी अशी मागणी मार्गावरील प्रवाशी धारककांनी परभणी विभागीय नियंत्रक व पाथरी विधानसभेचे लोक प्रिय आमदार राजेश दादा विटेकर यांच्या कडे केली आहे.

पाळोदी मार्गे परभणी कडे जाणाऱ्या प्रवाश्यांची संख्या दिवसें दिवस वाढत जात असून सद्या पाथरी आगाराची एकच बस फेऱ्या मारत असल्यामुळे त्याच बस मध्ये मोठी गर्दी होत आहे तर विशेष म्हणजे विदयार्थ्यांची ही ये जा करण्याची मोठी संख्या आहे सदरील विषयी वेळोवेळी मागणी केली परंतु कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने सदरील प्रश्न लोकप्रिय आमदार राजेश दादा विटेकर यांच्या निदर्शनास सामाजिक कार्यकर्ते मोसीन खान पाळोदिकर यांनी आणून दिली असता त्यांनी कोणता ही विलंब न करता तात्काळ विभागीय नियंत्रक यांना पत्र देऊन परभणी आगाराची - पाळोदी मार्गे पाथरी बस सोडण्यात यावी अशा मागणीचे दिले आहे. त्यामुळे प्रवाश्यांची होणारी गैरसोय टाळली जाणार आहे सद्या सुरु असलेल्या बस मध्ये दररोज १५० पेक्षा जास्त शाळेतील व कॉलेज मधील शिक्षण घेणारी मुले - मुली ये - जा करतात व इतर प्रवाशांसाठी ही बस पुरेशी नसून या बस मध्ये मोठया प्रमाणात गर्दी होत आहे. तरी सदरील बाबिकडे परभणी विभागीय नियंत्रक यांनी लक्ष देऊन परभणी आगाराची एक बस फेरी वाढवून परभणी - पाळोदी मार्गे - पाथरी ही फेरी कायम स्वरूपी सुरु करावी अशी मागणी केली आहे. पाथरी विधानसभेचे आमदार राजेश दादा विटेकर यांनी ही सदरील बाबत सकारात्मक भूमिका घेत विभागीय नियंत्रक यांना मागणी केली.

## पूर्णा न.प. नगराध्यक्षा म्हणून सौ.विमलबाई लक्ष्मणराव कदम यांनी स्वीकारला पदभार

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** पूर्णा नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. विमलबाई लक्ष्मणराव कदम यांनी एक जानेवारी गुरुवार रोजी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यानिमित्ताने आयोजित पदग्रहण व सत्कार सोहळा नगरपालिकेत उत्साहात पार पडला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

पूर्णा शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. शहराचा सर्वांगीण विकास करण्यात येईल जनता ही मायबाप असून आपण जनतेचे सेवक आहोत याप्रमाणे चांगली कामे नगरसेवकांनी करावीत नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील कामांचे नियोजन करून आराखडा सादर करावे त्याप्रमाणे निधी आणून कामे केली जातील, शहरातील नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम जून पर्यंत पूर्ण करून शहराला स्वच्छ पिण्याचे पाणी देण्यात येईल असे आ.गुट्टे यांनी नगर परिषदेच्या वतीने लोकनियुक्त नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने बोलत होते.

१ जानेवारी गुरुवार रोजी पूर्णा नगरपरिषद नगराध्यक्ष म्हणून विमलबाई लक्ष्मणराव कदम यांनी आपल्या पदभार स्वीकारला यावेळी व्यासपीठावर आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे, पेश इमाम शमीम अहेमद रीजवी,संतोष एकलारे ,आ.गुट्टे मित्र मंडळ तालुका प्रभारी तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी नितीन उर्फ बंटी कदम, लक्ष्मणराव कदम, तालुकाध्यक्ष सुभाष देसाई, शहराध्यक्ष ॲड. राजेश भालेराव,नगर परिषद कार्यालय अधीक्षक मुंतजीप खान, गटनेता अब्दुल मुजीब, मोकींद भोळे,मिलींद कांबळे,




विश्वनाथ होळकर,ॲड.गोविंद ठाकूर,अमोल ठाकूर,ईश्वर ठाकूर तसेच नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका, सुधाकर खराटे, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी, पदाधिकारी,नागरिक,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









# पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ अनाथांची आई



आहेत. देवा आम्हाला हसायला शिकव, पण आम्ही कधी रडलो होतो याचा विसर पडू देऊ नकोस ही ओळ ज्या स्त्रीने प्रत्यक्ष आयुष्यभर जगून दाखवली, त्या ज्येष्ठ समाजसेविका पद्मश्री डॉ. सिंधुताई (माई) सपकाळ यांनी अनाथ, उपेक्षित आणि दुर्लक्षित मुलांसाठी आपलं संपूर्ण आयुष्य वाहून घेतलं. स्वतःचं आयुष्य वेदनांनी भरलेलं असतानाही त्यांनी त्या वेदनांना शक्तीत रूपांतर केलं.

बालविवाह, अन्याय, उपेक्षा आणि समाज बहिष्कार अशा असंख्य संघर्षांतून मार्ग काढत त्यांनी रस्त्यावरच्या, रेल्वे स्थानकांवरील, स्मशानात राहणाऱ्या अनाथ मुलांना कवेत घेतलं. आई या नात्याचा खरा अर्थ त्यांनी कृतीतून दाखवला. सिंधुताईंच्या ममत्वामुळे हजारो मुलांना केवळ निवारा नव्हे, तर ओळख, शिक्षण आणि सन्मानाचं आयुष्य मिळालं. अनेक अनाथ मुलांसाठी त्यांनी आश्रम उभारले, त्यांना शिक्षणाची गोडी लावली आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित केलं. आज डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते म्हणून समाजात उभे असलेले अनेक जण अभिमानाने आम्ही माईंची मुलं आहोत असं सांगतात.

सिंधुताई सपकाळ म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, तर मातृत्वाची चळवळ होती. त्यांनी समाजाला शिकवलं की रक्ताचं नातं नसतानाही माया करता येते, आणि एका माणसाच्या ममतेतून हजारो आयुष्य उजळू शकतात. आज माई आपल्यात नसल्या तरी त्यांनी पेटवलेला मायेचा दिवा कधीही विझणार नाही. अनाथांच्या ओठांवरचं हसू, त्यांच्या डोळ्यांतली स्वप्नं आणि त्यांच्या आयुष्यातली दिशा याच सिंधुताई सपकाळ यांची खरी, जिवंत स्मृती आहे.

सिंधुताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात गुरेढोरे पाळणाऱ्या गरीब कुटुंबात झाला. एका गरीब कुटुंबात जन्मल्यामुळे त्यांना चिंदीचे कपडे घालावे लागत होते. सिंधुताईंच्या वडिलांचे नाव अभिमान साठे होते. त्यांचे वडील सिंधुताईंचे शिक्षण घेण्यास उत्सुक होते. सिंधुताईचे वडील त्यांना गुरे चारण्याच्या निमित्ताने बाहेर शाळेत पाठवत असत.

आईच्या विरोधामुळे आणि घराच्या आर्थिक परिस्थितीमुळे सिंधुताई यांच्या शिक्षणाला खीळ बसली. आर्थिक परिस्थिती, लहान वयात घरातल्या जबाबदाऱ्या आणि बालविवाहामुळे त्यांना चौथीपर्यंत शिकता आले आणि नंतर त्यांना शाळा सोडावी लागली. सिंधुताईं सपकाळ यांचा विवाह वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी वयाने २६ वर्षांनी मोठे असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी वर्धा जिल्ह्यात झाला.

लग्नानंतर त्यांना खूप कठीण जीवनाचा सामना करावा लागला परंतु त्यांनी आशा गमावली नाही. त्यांच्या माहेरी त्यांनी महिलांच्या शोषणाविरूद्ध लढा दिला जे वन विभाग आणि जमीनदारांसाठी शेण गोळा करण्यासाठी वापरत होते. यामुळे त्यांचे जीवन अजून कठीण झाले. या लढाईनंतर त्यांचे आयुष्य अधिक कठीण होईल हे त्यांना माहित नव्हते. वयाच्या २० व्या वर्षी जेव्हा त्या गरोदर राहिल्या, तेव्हा एका चिडलेल्या जमीनदाराने कपट मनाने घृणास्पद अफवा पसरविली कि हे मूल दुसर्याचे आहे. त्यामुळे नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला, त्यामुळे नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही त्यांना गावाबाहेर काढले. त्याच रात्री सिंधुताईला अतिशय निराशजनक आणि मोठा धक्का बसला होता, त्यांनी एका गाईच्या गोठ्यामध्ये मुलीला जन्म दिला.

एकीकडे त्यांनी आपल्या वडिलोपार्जित घरी जाण्यासाठी त्यांनी धडपड केली, परंतु त्यांच्या आईनेही त्यांना नकार दिला. सिंधुताईंनी आपल्या गरजा भागवण्यासाठी रस्त्यावर आणि रेल्वे स्थानकांवर भीक मागितली. त्यांचे अतिशय संघर्षमय जीवन हे स्वतःचे आणि मुलीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी होते. जगण्याच्या या संघर्षमय प्रवासात सिंधुताई महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यात चिकलदारा येथे आल्या. येथे वाघ संरक्षण प्रकल्पामुळे ८४ आदिवासी गावे रिकामी करण्यात आली. त्यामुळे सिंधुताईंनी असहाय आदिवासी ग्रामस्थांचे योग्य पुनर्वसन करण्यासाठी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या प्रयत्नांना वनमंत्र्यांनी मान्यता दिली आणि त्यांना पर्यायी पुनर्वसनासाठी योग्य ती व्यवस्था केली. त्यानंतर सिंधुताई आपल्या मुलीसोबत रेल्वे स्थानकात राहू लागल्या.

पोट भरण्यासाठी भीक मागणे आणि स्वत: ला आणि मुलीला रात्री सुरक्षित ठेवण्यासाठी स्मशानभूमीत राहत असे. आपल्या या संघर्षमय काळात त्यांना समजले की देशात अशी अनेक अनाथ मुले आहेत ज्यांना आईची गरज आहे. तेव्हापासून त्यांनी ठरविले की जो कोणी अनाथ त्यांच्या कडे येईल, त्यांची आई म्हणून संभाळ करेन.

त्यांनी स्वतःची मुलगी 'श्री दगडूशेठ हलवाई, पुणे, महाराष्ट्र' ट्रस्टला दत्तक दिली, कारण त्या सर्व अनाथ मुलांच्या आई बनू शकेल. बरीच वर्षे अथक परिश्रमानंतर सिंधुताईंनी चिखलदरा येथे पहिले आश्रम बांधले. त्यांनी आश्रमशाळांसाठी पैसे गोळा करण्यासाठी त्यांनी बरीच शहरे आणि गावे भेट दिली.

स्वतंत्र भारतात जन्मल्यानंतरही भारतीय समाजात उपस्थित सामाजिक अत्याचारांना त्या बळी पडल्या. आपल्या जीवनाचे धडे घेत त्यांनी महाराष्ट्रात अनाथांसाठी सहा अनाथाश्रम बनवले, त्यांना अन्न, शिक्षण आणि निवारा उपलब्ध करुन दिला. त्यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या संस्थांनी असहाय आणि बेघर महिलांना मदत केली. आपले अनाथाश्रम चालविण्यासाठी सिंधुताईंनी पैशासाठी कुणापुढे हात कधीच पसरवले नाहीत, त्याऐवजी त्यांनी सार्वजनिक व्यासपीठातून प्रेरणादायी भाषणे केली आणि समाजातील वंचितांना व उपेक्षित वर्गांना मदत करण्यासाठी जनतेचा पाठिंबा मागितला. आयुष्यातील कष्टातून एक आत्मा एक हजाराहून अधिक मुलांची आई म्हणून जन्माला आली आणि तिने आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले. माईंनी १२०० हुन अधिक मुलांना दत्तक घेतले आहे, जे प्रेमाने त्यांना 'माई' म्हणून संबोधतात. त्यापैकी बरेच लोक आता प्रतिष्ठित ठिकाणी डॉक्टर आणि वकील म्हणून काम करत आहेत. ७० वर्षांच्या आयुष्यात तिने २२० अधिक जावई आणि ५० अधिक सुना यांचा एक भव्य कुटुंब वाढवलेले आहे. माई ने १२०० हून अधिक अनाथ मुलांना दत्तक घेतले आणि त्यांना अन्न, निवारा आणि शिक्षण दिले.

सन २०१६ मध्ये, सिंधुताईंना सामाजिक कार्यासाठी डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चतर्फे साहित्यात डॉक्टरेट पदवी देण्यात आली. सिंधुताईंना २०२१ मध्ये भारताच्या माननीय राष्ट्रपतींनी 'पद्मश्री' देऊन सन्मानित केले होते, त्यांच्या समर्पित सामाजिक कार्यासाठी १००० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

पद्मश्री पुरस्कार हा त्यांच्या कार्याला मिळालेला सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान ठरला. मात्र, माईंसाठी पुरस्कार कधीच अंतिम ध्येय नव्हतं. माझ्या लेकरांचं हसू हाच माझा खरा सन्मान आहे, हे त्यांचं वाक्य त्यांच्या आयुष्याचं तत्त्वज्ञान स्पष्ट करतं. सिंधुताई माईंचा संदेश - जर तुम्ही कुणाला जगवायचे ठरवलं, तर येणाऱ्या प्रत्येक अडचणीला सामोरे जाण्याची तयारी असावी. संघर्षाला हरता नाही, तर जीवन बदलू शकते. सिंधुताई सपकाळ यांचा प्रवास हे दाखवतो की सहृदयता, धैर्य आणि निस्वार्थ सेवा यामुळे केवळ मुलांचे जीवन बदलत नाही, तर समाजालाही प्रेरणा मिळते.





अनिल आगलावे
मो. ९७६७०९९७११

**४ जानेवारी** हा दिवस सिंधुताई सपकाळ यांचा स्मृतीदिन म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ त्यांच्या जाण्याची हळहळ व्यक्त करण्याचा नसून, त्यांनी दिलेल्या मूल्यांचा वारसा पुढे नेण्याचा आहे. समाजातील प्रत्येक दुर्बल घटकासाठी संवेदनशील राहणं, हीच माईंच्या कार्याला खरी श्रद्धांजली ठरेल. आज सिंधुताई सपकाळ आपल्यात नसल्या, तरी त्यांनी पेटवलेला माणुसकीचा दिवा अजूनही हजारो आयुष्यांत उजेड पसरवत आहे.

अनाथांच्या ओठांवरचं हसू, त्यांच्या डोळ्यांतली स्वप्नं आणि त्यांच्या पावलांना मिळालेली दिशा याच माईंच्या अमर अस्तित्वाच्या साक्षी

## ममताताई बनल्या माऊली...

अनाथांना आईपण देणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ आज भौतिक रूपात आपल्यात नसल्या, तरी त्यांनी दिलेली माया, संस्कार आणि विचारांची मशाल विझलेली नाही. माईंचा तोच अमूल्य वारसा आता ममता ताई अधिक प्रेमाने, अधिक जबाबदारीने आणि तितक्याच संवेदनशीलतेने पुढे नेत आहेत. माईंनी ज्या लेकरांना आई होऊन माया केली, त्यांनाच आता ममता ताई माऊली बनून आयुष्याचा आधार देत आहेत.

माईंच्या जाण्यानंतर आता या अनाथ मुलांचं काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात होता. मात्र ममता ताईंनी शब्दांपेक्षा कृतीतून उत्तर दिलं आहे. माईंच्या सान्निध्यात घडलेल्या, त्यांच्या विचारांवर वाढलेल्या ममता ताईंनी हा वारसा केवळ जपला नाही, तर तो अधिक भक्कम केला आहे. माईंच्या विचारांतून उभी राहिलेली नवी जबाबदारी



सिंधुताई सपकाळ यांनी समाजाला शिकवलं की, आईपण हे रक्ताचं नव्हे, तर मायेचं नातं आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून ममता ताई आज अनाथ मुलांच्या आयुष्याचा आधार बनल्या आहेत.

माईंसोबतचा प्रदीर्घ सहवास, आश्रमातील अनुभव आणि प्रत्येक मुलाशी निर्माण झालेलं भावनिक नातं यातूनच ममता ताईंची भूमिका आकाराला आली. माया, शिस्त आणि भविष्याचा समतोल ममता ताईंचा सांभाळ म्हणजे केवळ निवारा किंवा व्यवस्था नाही. तो आहे आईसारखा आधार, मार्गदर्शकासारखं बळ आणि भविष्य घडवणारी दिशा. शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संस्कार आणि स्वावलंबन यावर त्या विशेष भर देत आहेत. प्रत्येक मुलाच्या आयुष्यात त्या कधी मायेने जवळ घेतात, तर कधी कठोरपणे योग्य दिशा दाखवतात.

ही मुले समाजावर ओझं नाहीत, तर समाजाची संपत्ती आहेत, हा माईंचा विचार ममता ताई ठामपणे पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक मुले शिक्षणात प्रगती करत असून आत्मविश्वासाने स्वतःचं भविष्य घडवण्याच्या मार्गावर आहेत. सिंधुताई सपकाळ यांचा वारसा म्हणजे केवळ आठवणी नव्हेत, तर अखंड सुरू असलेली मायेची चळवळ आहे. ममता ताईंच्या रूपाने ही चळवळ अधिक बळकट होत आहे. माईंची माया आजही जिवंत आहे-ती प्रत्येक मुलाच्या हसण्यात, स्वप्नांत आणि आत्मविश्वासात दिसून येते. माई गेल्या, पण माया गेली नाही. आईनंतर आता ममता ताई, अनाथांसाठी अजूनही माऊलीच...

## शेकडो अनाथ मुलींचं केलं कन्यादान...

समाजातील अनाथ आणि निराधार मुलांसाठी आयुष्यभर मायेचं छत्र उभं करणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ यांनी केवळ आश्रयच दिला नाही, तर आईच्या भूमिकेतून त्यांनी शेकडो मुलींचं कन्यादान करून मातृत्वाचं सर्वोच्च रूप जगासमोर ठेवलं.

ज्या मुलींना जन्मदात्या आई-वडिलांचं छत्र लाभलं नाही, त्या मुलींच्या आयुष्यात माईंनी आईची जागा भरून काढली. मुलीचं लहानपण, शिक्षण, संस्कार, तिच्या भविष्याची चिंता आणि लग्नाच्या वेळी आई म्हणून उभं राहणं-ही सर्व जबाबदारी माईंनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. माईंच्या आश्रमात वाढलेल्या अनेक मुलींच्या लग्नात माईंनी आई म्हणून कन्यादान केलं.



विवाहासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, संसारासाठी संस्कार, तसेच समाजात सन्मानाने उभं राहण्यासाठी आत्मविश्वास देणं-हे सर्व माईंनी केवळ कर्तव्य म्हणून नव्हे, तर मायेने केलं. कन्यादानाच्या वेळी आज माझी मुलगी सासरी जाते आहे असं म्हणताना माईंच्या डोळ्यांतून वाहणारी माया आणि ओलावा, हे दृश्य पाहणाऱ्यांच्या मनाला स्पर्शून जायचं.

समाजाला दिलेला मोठा संदेश माईंच्या या कार्यातून समाजाला एक ठाम संदेश मिळाला. आईपण हे रक्ताचं नसतं, ते मायेचं असतं. अनाथ मुलींच्या लग्नात उभं राहून माईंनी समाजातील रूढ कल्पनांना छेद दिला आणि माणुसकीचं दर्शन घडवलं.

माईंसाठी कन्यादान म्हणजे केवळ विधी नव्हता. त्या प्रत्येक मुलीच्या सासरीही तिच्या पाठीशी उभ्या राहत. अडचण आली, तर समजावणं, धीर देणं आणि गरज पडल्यास आधार देणं-हे नातं लग्नानंतरही कायम राहायचं. आज माई आपल्यात नसल्या, तरी त्यांनी केलेल्या शेकडो कन्यादानांच्या आठवणी आणि त्या मुलींच्या आयुष्यात माईंचं स्थान अढळ आहे.

आता माईंचाच वारसा पुढे नेत ममता ताई या मुलींसाठी आईसारखाच आधार बनून उभ्या आहेत. जन्म न देता आईपण निभावणं, रक्ताचं नातं नसतानाही कन्यादान करणं हेच सिंधुताई सपकाळ यांचं असामान्य मातृत्व.

## माईंच्या दूरदृष्टीतून घडलेली आयुष्यं...

समाजातील अनाथ आणि निराधार मुलांना केवळ मायेची ऊब नव्हे, तर स्वाभिमानाने जगण्याची दिशा देणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो आयुष्यांना यशस्वी मार्ग मिळाला. माईंसाठी अनाथ मुलांना सांभाळणं हे केवळ दयेचं काम नव्हतं, तर त्यांना सक्षम नागरिक बनवण्याचं ध्येय होतं. माईंनी अनाथांसाठी उभारलेली व्यवस्था ही केवळ निवारा देणारी नव्हती. शिक्षण, शिस्त, संस्कार आणि मेहनतीचं महत्त्व या चार स्तंभांवर त्यांनी अनाथ मुलांचं भविष्य उभं केलं. भीक नको, बळ द्या, हा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येत होता. अनाथ मुलांनी शाळेत जावं, शिकावं, विचार करायला शिकावं आणि स्वतःचं आयुष्य घडवावं, यासाठी त्या सातत्याने आग्रही होत्या. शिक्षणामुळेच ही मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात आली, हा माईंचा ठाम विश्वास होता.





मांडणी/सजावट
विपीन वीर
उपसंपादक, मो. ८४२१४८९७२०

## यशस्वी आयुष्यांची साक्ष...



आज माईंच्या आश्रयाखाली वाढलेली अनेक मुले डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक आणि समाजसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या यशात माईंच्या दूरदृष्टीचं प्रतिबिंब स्पष्टपणे दिसतं. माई नेहमी म्हणायच्या, माझी मुलं माझ्यावर अवलंबून राहिली, तर माझं काम अपूर्ण राहील. त्यामुळेच त्यांनी मुलांना स्वावलंबी, निर्णयक्षम आणि समाजासाठी उपयोगी बनवण्यावर भर दिला. आज माई आपल्यात नसल्या, तरी त्यांनी दाखवलेला मार्ग अजूनही अनाथांच्या आयुष्याला दिशा देत आहे. माईंची दूरदृष्टी ही केवळ त्या काळापुरती मर्यादित नव्हती. ती पुढील पिढ्यांसाठीही मार्गदर्शक ठरली आहे. माई गेल्या, पण दिशा दिली गेली. माया दिली, पण त्याहून मोठं जगण्याचं यशस्वी शास्त्र दिलं. माईंनी मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान दिलं नाही, तर जीवनमूल्यांची शिदोरी दिली. प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी, जबाबदारीची जाणीव आणि समाजाप्रती कृतज्ञता या संस्कारांमुळे अनाथ मुले आत्मविश्वासाने उभी राहिली.

# आकांक्षित तालुकांतर्गत सर्व कामे वेळेत पूर्ण करावेत– जिल्हाधिकारी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

निती आयोगाच्या निर्देशांकानुसार आकांक्षीत तालुका हिंगोलीसाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार सर्व संबंधित यंत्रणांनी नियोजित कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आकांक्षीत हिंगोली तालुक्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, सहायक जिल्हाधिकारी तथा गटविकास अधिकारी योगेशकुमार मीना, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्राथमिक आरोग्य केंद्रांप्रमाणे सर्व आरोग्य उपकेंद्रे एनक्वास प्रमाणित करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करावी व त्याबाबतची माहिती सादर करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले. उच्च रक्तदाब असलेल्या नागरिकांसाठी मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविण्यात यावा. यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करावी. तसेच आशा सेविकांमार्फत ३० वर्षांवरील नागरिकांचे स्क्रिनिंग करावे. स्क्रिनिंगनंतर नागरिकांची वर्गवारी करून त्यांचे समुपदेशन करावे. यासाठी एफएक्यू तयार करावेत व त्यानुसार सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आशा व एमपीडब्ल्यू यांना प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी वेळापत्रक व साहित्य तयार करावे. संबंधित नागरिकांचे आभा कार्ड व आयुष्मान भारत कार्ड काढून घेऊन एनएचएममार्फत त्यांचा डिजिटल डेटाबेस तयार करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी 'सुपर ५०' व 'सुपर १००' उपक्रम राबवावा. यासाठी चाळणी परीक्षा ठेवावी. यामध्ये निवडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त वर्ग घेऊन त्यांची गुणवत्ता सुधारावी. तसेच आकांक्षीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

हिंगोली तालुक्याची आकांक्षीत तालुका म्हणून असलेली ओळख पुसण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषी व इतर सेवा, पायाभूत सुविधा तसेच सामाजिक विकास या सहा निर्देशांकांवर लक्ष केंद्रित करून कामकाज करावे. शाळेतील स्वच्छतागृहे, प्रधानमंत्री आवास योजना यासह विविध योजनांचा आढावा घेऊन निती आयोगाच्या निर्देशांकानुसार १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करून संबंधित डेटा निती आयोगाच्या पोर्टलवर अपलोड करावा. यामुळे आकांक्षीत हिंगोली तालुक्याची रँकिंग सुधारण्यासाठी सर्वांनी प्रभावीपणे काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

# हिंगोलीत शौर्य दिनानिमित्त स्तंभाला मान्यवरांकडून अभिवादन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

येथील सिद्धार्थ(मिलिंद) कॉलनी भागात भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त स्तंभाच्या प्रतिकृतीला मानवंदना व अभिवादन करण्यात आले.या वेळी नवनिर्वाचित नगरसेवक श्रीराम बांगर, रवींद्र वाढे, नगरसेविका शोभाबाई अशोक काळासरे, ज्योतीताई सुखदेव बलखंडे यांचा सत्कार करण्यात आला.

सिद्धार्थ सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्या सर्वे नंबर २९ मध्ये असलेल्या मोकळ्या जागेत दरवर्षीप्रमाणे भीमा कोरेगाव शौर्य दिन कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमास रिपाई नेते मधुकरराव मांजरमकर, नगरसेवक श्रीराम बांगर, रवींद्र वाढे, शोभाबाई काळासरे, ज्योतीताई बलखंडे, भारतीय बौद्ध महासभेचे सुभाष भिसे, भीमराव कुरुडे, रामचंद्र वाढे, जी.जी.धुळे, लोक संघाचे त्र्यंबक पोघे, पत्रकार शांताबाई मोरे, सचीव प्रयागबाई हनवते, कोषाध्यक्ष लताबाई भुकतर, अंजली इंगोले आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी पंचरंगी व निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण आणि नामफलकाचे अनावरण अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्या नंतर संस्थेच्या जागेवर तात्पुरता उभारण्यात आलेल्या १५ फुट उंच शौर्य स्तंभाच्या प्रतिकृतीस मानवंदना देवुन अभिवादन करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना नगरसेवक श्रीराम बांगर म्हणाले की, सिद्धार्थ सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्या सर्वे नंबर २९ मधील या जागेवरील अनाधिकृत अतिक्रमण काढून या जागेचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नगरपालिकेच्या पहिल्याच बैठकीमध्ये आम्ही सर्वजण मिळून तसा ठराव घेणार असल्याचे सांगितले. या वेळी बौद्धवंदना सुनंदा धांडे, शालिनी जाधव,कविता मोरे,जिजाबाई लबडे यांनी घेतली.

कार्यक्रमास बार्टीचे समता दूत, महार रेजिमेंटचे सैनिक, समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा, सोशल एज्युकेशन मोमेंट लोकसंघ, विविध कर्मचारी व राजकीय संघटनांच्या पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा इंगोले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आशाबाई खिलारे, मेघा दिपके, विमल पंडित, गिताबाई दिपके, कल्पना भुक्तर, सुकेशनी सरकटे, मीनाबाई राऊत, दैवशाला साबळे, संगीता सरकटे, महानंदा पुडंगे, संगीता मुळे, मनीषा इंगोले, आम्रपाली भुक्तर, मनीषा इंगोले, यांच्यासह विशाखा महिला मंडळ व युवक मंडळाने परिश्रम घेतले.कार्यक्रमास शहरातील विविध भागातील नागरिक व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू गंगा कदम हिचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

हिंगोली जिल्ह्याची भूमिपुत्र असलेली गंगा कदम या खेळाडूने अंध महिला क्रिकेट टीमचे उपकर्णधार म्हणून नेतृत्व करीत भारताला टी ट्वेंटी विश्वचषक मिळवून दिले तिच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल मराठा सेवा संघाच्या वतीने २ जानेवारी रोजी हिंगोलीत भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, राज्य कार्यकारिणी सदस्य खंडेराव सरनाईक काका,विभागीय अध्यक्ष डॉ. नामदेव कोरडे, हिंगोली जिल्हाध्यक्ष शिवाजीराव ढोकर पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर , जिजाऊ ब्रिगेडच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष प्रियंका योगेश भोयर, जिल्हा कार्याध्यक्ष पंडित अवचार, जिल्हा उपाध्यक्ष गोपाल भोस , जिल्हा सचिव राजकुमार वायचाळ , योगेश भोयर कार्यकारणी सदस्य गजानन मगर, श्याम सोळंके, फुटाणा येथील सरपंच दत्तराव कदम, नंदू कदम, हरिभाऊ मुटकुळे, शिवराज सरनाईक, तांबिले यांच्यासह मराठा समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



**हिंगोली– सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील प्रभाग क्रमांक १५ मध्ये नगरसेवक श्रीराम बांगर यांच्याहस्ते नवीन सीसी रोडचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक विशाल गोटरे, रत्नाकर बांगर, सुमित कांबळे यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### बालविवाह मुक्त उपक्रमांतर्गत कार्यक्रम

हिंगोली– जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरपलवार तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे यांच्या नियोजनानुसार अनुसया विद्यामंदिर, खटकाळी (ता. जि. हिंगोली) येथे बाल विवाहमुक्त भारत या उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बालविवाहाचे दुष्परिणाम, बालविवाह प्रतिबंध कायद्यातील तरतुदी तसेच बालकांच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण विकासावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे, बाल संरक्षण अधिकारी जरीबखान पठाण, चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे केसवर्कर राजरत्न पाईकराव उपस्थित होते. तसेच अनुसया विद्यामंदिरचे मुख्याध्यापक नरेंद्र मोगरगे, अंकुश वानखेडे आदी शिक्षकवृंद, महिला कर्मचारी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये बालविवाह प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण होऊन बालविवाहमुक्त समाज घडविण्याचा संदेश देण्यात आला.

### आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राप्त अर्जाच्या छाननीसाठी पथकांची नियुक्ती

हिंगोली– जिल्ह्यातील रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी दि. २४ डिसेंबर, २०२५ ते दि. २ जानेवारी, २०२६ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तयार करण्यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राप्त अर्जांची दि. ५ व ६ जानेवारी, २०२६ रोजी छाननी करण्यात येणार असून ही कार्यवाही उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) केशव गड्डापोड व शिक्षणाधिकारी (मा.) संदीपकुमार सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली पार पडणार आहे. पथकात नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि. ५ व ६ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राप्त सर्व अर्जांची छाननी पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान गोपनीयता बाळगणे अत्यावश्यक असून कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी छाननीच्या ठिकाणी मोबाईल फोन घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच अर्ज छाननीसाठी गैरहजर राहणाऱ्या, निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, अशी गंभीर सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची तात्काळ व काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत.

### जामगव्हाण तांडा शिवारात जुगार अड्ड्यावर धाड

हिंगोली– जामगव्हाण तांडा येथील जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून ३ दुचाकी, ४ मोबाईलसह ३ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# सावित्रीबाईंमुळेच आज महिलांना सुखाचे दिवस– विठ्ठल सोळंके



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

फुलेंनी जर का शिकवले नसते सावित्रीबाईंला आज सुखाचे दिवस आलेच नसते कुण्याच बाईला या गीतातील ओळीप्रमाणे सावित्रीबाईंची प्रखर बुद्धिमत्ता लक्षात घेता महात्मा फुलेंनी त्यांना शिक्षण देऊन देशातील पहिली महिला शिक्षिका बनवले. त्याचाच परिणाम म्हणून आज सर्व क्षेत्रातील महिलांना सुखाचे दिवस आले असल्याचे प्रतिपादन श्री बालाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके यांनी केले. शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. शाळेच्या विद्यार्थिनी संजीवनी गुहाडे, विद्या भडंगे, ईश्वरी पोटे,पायल मुकाडे आदींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत सादर केले तर वनिता दुधाळकर,अंजली माहोरे, शिवशंकर दुधाळकर आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा खोलगडे व शीतल डाखोरे यांनी केले. शाळेचे सर्व शिक्षक राम किशन मोरे, मोहन धवसे, दिलीप सावते, गंगाप्रसाद भिसे, द्वारका डुकरे यांनी प्रसंगोचीत मार्गदर्शन केले.

# औंढा नागनाथ दर्शनासाठी आता ऑनलाईन सुविधा सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

हिंगोली जिल्ह्यातील ऐतिहासिक व पवित्र औंढा नागनाथ अष्टम ज्योतिर्लिंग मंदिर येथे भाविकांच्या सोयीसाठी पूजा, अभिषेक, दर्शन तसेच दानासाठी ऑनलाइन बुकिंग सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे देश-विदेशातील भाविकांना घरबसल्या भगवान शंकराची पूजा-अर्चा करण्याची संधी उपलब्ध झाली असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

औंढा नागनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी आठवे महत्त्वाचे ज्योतिर्लिंग असून, हजारो वर्षांपासून हे तीर्थक्षेत्र भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र राहिले आहे. पौराणिक कथेनुसार, दारुकावन येथे भगवान शंकराने राक्षसांचा संहार करून नागाच्या रूपात प्रकट झाल्याने या ज्योतिर्लिंगाला नागनाथ असे नाव प्राप्त झाले. औंढा नागनाथ हे भारतातील एकमेव भूमिगत ज्योतिर्लिंग आहे. येथे दरवर्षी २५ लाख भाविक भेट देतात. याची संख्या दुप्पट म्हणजे ५० लाख करण्यासाठी शासनाने औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली आहे. औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी जिल्ह्याच्या पालक सचिव श्रीमती रिचा बागला यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तनिवास, पार्कींग सुविधा, मुझियम, पार्क, लाईटींग यासह विविध अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २६० कोटी रुपयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्याला लवकरच उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन अंतिम करण्यात येणार आहे.

ऑनलाइन पूजा व अभिषेक सेवा : ऑनलाइन प्रणालीद्वारे भाविकांना विशेष सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महाअभिषेक (पूर्ण विधी व वैदिक मंत्रोच्चारासह) रुद्राभिषेक, लघु अभिषेक व साधी पूजा, सकाळ व संध्याकाळ आरती बुकिंग, वर्षभराचे वेळापत्रक, दर्शनासाठी आगाऊ स्लॉट बुकिंग मंदिर विकासासाठी ऑनलाइन दानाचा यात समावेश आहे. आतापर्यंत सुमारे १०० लाखांहून अधिक भाविकांनी पूजा व दर्शनाचा लाभ घेतला असून, ही ऑनलाइन सेवा शासनमान्य व प्रमाणित असल्याची माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये आनंद नगदी कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

येथील ऍ‍ड ग्यानबा रावजी शिरसाट सेवाभावी संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन विद्यालयांमध्ये 'आनंद नगरी' हा उपक्रम साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे आणि उदघाटक म्हणून वायचळ, शिरसाट, शिंदे, उमेश शेळके यांची उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिली. शाळेचे मुख्याध्यापक एस एस बल्लाळ विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमामुळे आत्मविश्वास नेतृत्व गुण व संघभावना वाढीस लागते असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तूची विक्री करून व्यवहार ज्ञानाचा अनुभव घेतला. पालक व शिक्षकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आनंद नगरी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव वाढल्याचे दिसून आले. कार्यक्रमासाठी उपस्थित पर्यवेक्षक श्रीकांत कान्हेड, अभिषेक चाटसे विद्या कान्हेड, नुतन वाबळे, भाग्यश्री ठोके, राजश्री पडघन, ज्योती मेटकर, कांचन टेकाळे आदींची उपस्थिती होती. इम्रान शेख, व नरवाडे ताईंनी सहकार्य केले.

# शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिंगोली जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी माध्यमिक पदाचा कार्यभार संदीपकुमार सोनटक्के यांनी नुकताच स्वीकारला आहे. याबद्दल त्यांचा मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संचाचे अध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे यांनी सत्कार केला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे संदीपकुमार सोनटक्के साहेब भारतीय विद्या मंदिर प्रशालेचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण याच विद्यालयातून घेतले. सत्काराला उत्तर देताना त्यांनी शाळेतील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी शाळेची शिस्त, अध्यापकांची अध्यापन पद्धती, अध्यापकांचा विद्यार्थ्यांप्रती असलेला जिव्हाळा या बाबींचा उपयोग जीवनात झाल्याचा उल्लेख केला. तसेच मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांनी आपल्या शाळेचे उच्च पदावर विराजमान असलेले माजी विद्यार्थी हे शाळेचे वैभव असतात असे गौरवोद्गार सोनटक्के साहेबांबद्दल अध्यक्षीय भाषणात काढले. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक व विद्यार्थी यांचे शिक्षणाधिकारी महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अध्यापक संजय कुलकर्णी यांनी केले.प्रसंगी शाळेचे पर्यवेक्षक अनिल लोळेवार, भारत शिंदे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# विकासाच्या कामावर निवडणूक लढणार: अमर राजुरकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

जाहीरनाम्यात नमूद करण्यात आलेली सर्व कामे सत्य व वास्तव असून स्वतःचा मोठेपणा करण्याचा भारतीय जनता पार्टीचा कुठलाही प्रयत्न नाही, ही निवडणूक भारतीय जनता पार्टी विकासाच्या कामावर लढणार असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार तथा भाजपा महानगराध्यक्ष अमर राजुरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेत चैतन्यबापू देशमुख, संतोष पांडागळे यांची उपस्थिती होती

यावेळी बोलताना माजी आमदार अमर राजुरकर म्हणाले की, भारतीय पक्षाची तयारी जोरात असून पक्ष संघटन देखील जोरात आहे. मनपा निवडणूक साठी ५२१ लोकांनी अर्ज केले होते त्यापैकी ६७ जणांना त्यांची पात्रता व निवडणूक लढण्यासाठी सक्षम असल्याचे पाहून उमेदवारी देण्यात आली आहे. या निवडणुकीत सक्षम असे उमेदवार देण्यात आले असून नांदेड मनपावर भाजपाचा झेंडा फडकेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



उद्या दि. ४ जानेवारी रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व नामदार पंकजा मुंडे या नांदेड दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत संचालन समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर आयटीआय परिसरातील भाजपाचा प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे लातूरकडे रवाना होणार आहेत. तर नामदार पंकजा मुंडे या माळाकोळी येथे कै. गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमास जाणार आहेत. विशेष म्हणजे दि.५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा इंदिरा गांधी मैदान गोकुळ नगर येथे आयोजित करण्यात आली आहे. तर दि. ६ जानेवारी रोजी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत बूथ कमिटी अध्यक्ष, शक्ती केंद्रप्रमुख यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती यावेळी माजी आमदार अमर राजूरकर यांनी दिली.

**शिवसेनेच्या अवास्तव मागणीमुळे युती तुटली: चैतन्यबापू देशमुख**

नांदेड महापालिका निवडणुकीसाठी भाजपा- शिवसेना शिंदे गटाची युती व्हावी म्हणून प्रयत्न करण्यात आले. यासाठी तीन बैठक देखील घेण्यात आल्या. परंतु जागा वाटपाबाबत चर्चा होत असताना शिवसेनेने अवास्तव मागणी केली. त्यामुळे शिवसेना -भाजपाची युती तुटली असून नांदेड मनपात भाजपाचा महापौर असेल असा विश्वास चैतन्यबापू देशमुख यांनी व्यक्त केला.

**जाहीरनाम्यातील कामे खासदार अशोक चव्हाण यांच्या कार्यकाळातील : पांडागळे**

भारतीय जनता पार्टीने प्रकाशित केलेल्या जाहीरनाम्यातील कामावरून विरोधक टीका करत असली तरी जाहीरनाम्यात नमूद केलेली सर्व कामे सत्य व वास्तव आहेत. खासदार अशोक चव्हाण काँग्रेस कार्य काँग्रेसमध्ये असताना त्यांच्याच कार्यकाळात ही सर्व कामे त्यांनी केली आहेत या जाहीरनाम्यामध्ये खासदार अशोक चव्हाण यांनी केलेल्या कामाचे प्रतिबिंब असून जनतेच्या हितासाठीचा हा जाहीरनामा असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे यांनी दिली.

# शालेय पोषण आहार योजनेच्या मध्यान्ह जेवणामध्ये निघाल्या आळया



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३ जानेवारी-**

पी एम श्री योजने मध्ये निवड झालेल्या इस्लापूर येथील जिल्हा परिषद हायस्कूल मधील विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह जेवणामध्ये सोयाबीनच्या भाजीमध्ये अळ्या आढळून आल्याने संबंधित विद्यार्थ्यांनी पालकाकडे तक्रार केल्याने दिनांक ३ रोजी इस्लापूर येथील पालकांनी जिल्हा परिषद शाळेमध्ये धाव घेतली. व संबंधित ठेकेदार व मुख्याध्यापकाने निष्काळजी केल्याप्रकरणी त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशा स्वरूपाची मागणी केली. सदरील घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने व वृत्तवाहिनीवर या संदर्भात बातम्या प्रकाशित झाल्याने. किनवट येथील गटशिक्षण अधिकारी अनिल महामुने यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन इस्लापूर शाळेला भेट दिली व सदरील प्रकरणांमध्ये सखोल चौकशी केली असता. इयत्ता सातवी मध्ये शिक्षण घेणारी कुमारी आराध्या बालाजी पळसपुरे या विद्यार्थिनीने शालेय पोषण आहारात देण्यात आलेल्या सोयाबीन च्या भाजीमध्ये आळ्या निघाल्याची संदर्भात मुख्याध्यापकास कळवले असता मुख्याध्यापकांनी मिल मेकर तेवढे फेकून द्या आणि भाजीतील रस्साया सोबत जेवण करा असा सल्ला दिला. असल्याची स्पष्ट कबुली गटशिक्षण अधिकारी यांच्या लेखी जबाब दिली. त्यातच दिनांक २ रोजी शाळेतील मेनू प्रमाणे आहार देण्यात आला नसून चव रजिस्टर सुद्धा संबंधित शाळेमध्ये उपलब्ध नव्हते. व आजच्या आहारात भाजीपाल्याची उणीव असल्याची सुद्धा गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यातच चौकस असलेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी चांगलेच मुख्याध्यापकास धारेवर धरले व पीएमसी योजनेअंतर्गत किती निधी उपलब्ध झाला या संदर्भात सुद्धा विचारणा केली. त्यामुळे मुख्याध्यापकाची चांगली धांदल उडाली. या चौकशी दरम्यान कोसमेट भिशी केंद्राची केंद्रप्रमुख सतीश शिरगुरवार व केंद्रप्रमुख उत्तम कानिदे यांचीही उपस्थिती होती. संतप्त झालेल्या पालक वर्गांना शांतपणे शाळेविषयक समस्या मांडण्याची वेळ गटशिक्षण अधिकाऱ्यांनी दिली. विद्यार्थ्यांची स्वच्छतागृह पाण्याची सोय व रिक्त शिक्षकांची पदे त्वरित भरण्यात यावी अशा स्वरूपाच्या सूचना पालक वर्गांनी दिल्या. सदरील प्रकरणाची कसून पणे चौकशी करून या प्रकरणाचा अहवाल वरिष्ठांना पाठविणार असल्याची ग्वाही याप्रसंगी गटशिक्षण अधिकारी अनिल महामुने यांनी पालक वर्गांना दिली.

## मुक्रमाबाद पोलीस ठाण्यास विद्यार्थ्यांची भेट

**बाऱ्हाळी** -येथील स्वामी विवेकानंद विद्या विहार या ईंग्रजी माध्यम शाळेने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाचे औचित्य साधून मुक्रमाबाद पोलिस ठाण्याला इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. शाळेचे प्राचार्य प्रविणकूमार रेड्डी,उप मुख्याध्यापक बालाजी पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पोलीस दिनाचे औचित्य साधून मुक्रमाबाद येथील पोलीस ठाण्यास विद्यार्थ्यांनी भेट दिली. स.पो.नि. राजेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक विभागाची सविस्तर माहिती दिली. सोबत रायफल आणि पिस्तूल यांचे डम्मी यांचे सादरीकरण करून दाखविण्यात आले व तसेच त्यांच्या प्रत्येक भागाचे सविस्तर माहिती देऊन त्यांचा वापर कोण आणि केंव्हा आणि कश्यासाठी केला जातो त्याचीही माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यास खावू वाटप करण्यात आला. शाळेकडून बालाजी पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे कर्मचारी श्री. शिंदे , प्रसाद , योगेश , किरण आणि लोमन ,पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी प्रभावी भूमिका बजावली.



## मुदखेड येथे भीमा कोरेगाव शौर्य दिन उत्साहात साजरा

**मुदखेड** -पुणे जिल्ह्यातील भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक लढाईच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी, मुदखेड शहरात दि.१ जानेवारी २०२५ रोजी २०८ वा शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त शहरातून भव्य रॅली काढण्यात आली असून, भीमा कोरेगावच्या विजयस्तंभाची प्रतिकृती सर्वांचे आकर्षण ठरली.या कार्यक्रमाची सुरुवात शहरातील 'बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्र' येथून झाली. १ जानेवारी १८१८ रोजी केवळ ५०० महार सैनिकांनी २८,००० पेशव्यांच्या फौजेचा पराभव करून विषमतेविरुद्ध समतेचा लढा जिंकला होता. या इतिहासाचे स्मरण करत, समता सैनिक दलाच्या ५० जवानांनी शिस्तबद्ध संचलन करत विजयस्तंभाला मानवंदना (सलामी) दिली. यानंतर ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. रॅलीमध्ये भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाची प्रतिकृती विशेष आकर्षण म्हणून ठेवण्यात आली होती, ज्याचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.या रॅलीचा समारोप डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित ठिकाणी झाला.


## पत्रकार संजय निळेकर यांना साई जीवनगौरव समाज भूषण पुरस्कार

**नवीन नांदेड** -ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई जीवनगौरवसमाजभूषण पुरस्कार २०२६ चा राष्ट्रीय पातळीवरून दिला जानारा हा पुरस्कार नांदेड सिडको येथील शासनमान्यचे मुख्य संपादक संजय मधुकरराव निळेकर यांना जाहीर झाला असून तो दिनांक १० जानेवारी रोजी प्रधान करण्यात येणार आहे. शिर्डी संस्थानच्या वतीने सामाजिक , राजकीय चळवळीत आत्मविश्वासाने आणि जिद्दीन व ध्येय साध्य करणारे तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्यातल्या सामान्य घटकापर्यंत जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांना शासकीय, राजकीय क्षेत्रातील वरिष्ठांकडून न्याय मिळवून देण्याचे काम सातत्याने करत असतात त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व खंबीरपणे समाजाच्या कल्याणासाठी सतत धडपड करणाऱ्या कार्याची दखल घेऊन नांदेड जिल्ह्यातील नांदेड येथील सिडको हडको परिसरातील शासनमान्यचे मुख्य संपादक संजय मधुकरराव वाघमारे निळेकर यांना ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई जीवन गौरव समाज भूषण पुरस्कार २०२६चा जाहीर झाल्याबद्दल मित्रमंडळी ,नातेवाईक व पत्रकार बांधवाच्या वतीने अभिनंदन केले आहे.



## माळाकोळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे आज अनावरण

**लोहा** -लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे ४ जानेवारी रोजी सायंकाळी माळाकोळी येथे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमासाठी माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण, माजी मंत्री धनंजय मुंडे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहेत. लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी जुनी संसद भवनाची प्रतिकृती असलली ईमारत उभारण्यात आली आहे. या पुतळा अनावर सोहळ्यासाठी आ. प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार तथा (राज्यमंत्री दर्जा) गोविंद आण्णा केंद्रे, खा. शिवाजी काळगे, आ.तुषार राठोड, आंबेडकर चळवळीतील अमन आंबेडकर, माजी आ. शंकर आण्णा धोंडगे, माजी आ. शामसुंदर शिंदे, माजी खा. सुधाकर श्रृंगारे, माजी आ. रोहिदास चव्हाण, सेवा जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे, मुक्तेश्वर धोंडगे, हभप माधव महाराज केंद्रे, बाजीराव भालेराव, सरपंच जनार्धन तिडके यांची उपस्थिती राहणार आहेत .या कार्येक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन सुरनर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्ये क्रम संपन्न होणार आहे तरी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लोकनेते गोपीनाथ मुंडे स्मारक समिती माळाकोळी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# सिंधू महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३ जानेवारी-**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त देगलूर येथील सिंधू कॉलेज ऑफ आय.टी.ॲण्ड सायन्स येथे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवयित्री सावित्री शेवाळकर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव अशोक दाचावार, उपप्राचार्य मिलिंद राजुरकर, सिंधुताई कांबळे यांची उपस्थिती लाभली. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्त्या कवयित्री सावित्री शेवाळकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या आयुष्यातील अज्ञान, अन्याय व दुःख दूर करण्यासाठी केलेले कार्य अतुलनीय असून स्त्रियांमध्ये संयम, धैर्य व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरित्रावर आधारित ग्रंथांचे वितरण करण्यात आले.



यावेळी सिंधुताई कांबळे व उपप्राचार्य मिलिंद राजुरकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन जीवनात प्रगती साधावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमात ऋतुजा जाधव, सृष्टी गायकवाड, साक्षी देशमुख, श्रुती बिरादार, अनुराधा बिरादार, सुवर्णा एन्नलवार, धनश्री तडखेले व संकेत भूपतवार आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन प्रा. अनुराधा गंधारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन मनीषा बोन्तापल्ले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सपना बुन्नावार यांनी केले. यावेळी प्रा. अभिनंदन सिताफुले, प्रा. भिमराव दिपके, प्रा. मारुती सोनकांबळे, प्रा. मिलिंद वाघमारे, प्रा. बाबूराव टेकाळे, मनीषा कळसकर, गजानन महाजन यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सावित्रीबाई शेवाळकर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या कवयित्री सावित्रीबाई शेवाळकर यांच्यातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चरित्रे ग्रंथ भेट म्हणून देण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांचे विचार समजावे त्यांची विचारधारा विद्यार्थ्यांना लक्षात यावी या अनुषंगाने हा स्तुत्य उपक्रम शेवाळकर यांनी राबविला. या ग्रंथ भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पत्रकार शेख निवडणुकीच्या रिंगणात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

नांदेड महापालिका निवडणुकांसाठी अनेक जणांनी तयारी केली असून या पत्रकार शेख याहीया दिखील मागे राहिले नाहीत. शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधून त्यांनी त्यांच्या पत्नी रुकसाना बेगम शेख या यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.



मागील जवळपास तेरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्राच्या माध्यमातून सामाजीक समस्या सोडवणाऱ्या शेख याहीया यांनी आता त्यांची पत्नी रुकसाना बेगम यांच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. प्रभाग क्रमांक १२ उमर कॉलनी मधून ते अपक्ष निवडणूक लढवीत असून त्यांना ऑटो रिक्षा ही निशाणी मिळालेली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या समाजहीनाच्या कामाचे फळ त्यांना या निवडणुकीत मिळणार अशी अपेक्षा व्यक्त होत असुन विकासाचा ऑटोरिक्षा या प्रभागातून नेहमीच धावणार असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. सध्याची परिस्थिती पाहता अनेक पक्ष राजकीय फायद्यासाठी तडजोडी करत असून जनतेची कामे करण्यासाठी आता अपक्ष उमेदवारच हवा त्यामुळे जनता नक्कीच साथ देईल असा विश्वास पत्रकार शेख याहीया यांनी व्यक्त केला.

# अटीतटी नाहीच! प्रभाग २ मधून काँग्रेसचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ३ जानेवारी-**

नुकत्याच पार पडलेल्या हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रभाग २ मध्ये उमेदवार असलेले ( माजी नगरसेवक )शेख कलीम शेख चांद व ( माजी नगरसेवक )फिरोज पठाण यांच्या आई रुकसानाबी अहमद खान पठाण यांनी ही निवडणूक अत्यंत सूक्ष्म नियोजनाने, शेकडो कार्यकर्त्यांची असलेल्या फौज वरती व मतदारांच्या मतरुपी आशीर्वाद वरती भरघोस मतांनी ही निवडणूक जिंकली असून त्यांच्या या विजयामुळे निवडणुकीच्या वेळेस दिलेला विकास कामांच्या बाबतीत प्रत्येक शब्द पूर्ण तत्वाकडे नेण्याचे आमचे ध्येय असणार असल्याचे आमच्या प्रतिनिधी बोलताना सांगितले असून माजी आ. जवळगावकर यांनी टाकलेला विश्वास व प्रभागातील नागरिकांच्या सुविधा बाबत कोणतीही तडजोड भविष्यात राहणार नसल्याचे देखील अधोरेखित केले.



नगरपालिकेची निवडणूक जाहीर होताच उमेदवारांची घोषणा तदनंतर प्रचाराची धुरा फिरोज पठाण यांच्या युवा कार्यकर्ते, मित्रमंडळी, ज्येष्ठ मार्गदर्शक यांनी आपल्या खांद्यावर घेत अगदी सूक्ष्म नियोजन लावत ही निवडणूक लढवुन यात एकतर्फी विजय प्राप्त केला. याच प्रभागात ओबीसी पुरुष या जागेवरती काँग्रेस पक्षाकडून शेख कलीम शेख चांद यांना उमेदवारी भेटल्यानंतर त्यांनी पण अगदी सूक्ष्म नियोजन लावत कोणत्याही प्रकारची कसर या प्रचार मोहिमेत न ठेवता प्रचार मोहिमेत जोरदार मुसंडी मारली होती त्यास फिरोज पठाण यांची साथ पूर्ण विश्वासाने लाभल्याने या दोन्ही उमेदवारांनी या प्रभागात विजय खेचून आणला. शेख कलीम हे यापूर्वी सुद्धा नगरसेवक राहिलेले आहेत त्यांचा पूर्वीचा अनुभव लक्षात घेता त्यांना व फिरोज पठाण हे सुद्धा यापूर्वी नगरसेवक राहिलेले असता त्यांचाही अनुभव लक्षात घेता या जोडीस प्रभागातील जनतेने मतदान रुपी भरपूर आशीर्वाद दिले त्यामुळेच ही निवडणूक अटीतटीची न होता एकतर्फी झाल्याची चर्चा असून त्यांनी ही निवडणूक भरघोस मतांनी जिंकली असेच म्हणावे लागेल. या प्रभागावर प्रत्येक पक्षाचे प्रमुख यांनी विशेष लक्ष दिले होते पण त्यास सुरुंग लावण्याची यशस्वी खेळी माजी आमदार जवळगावकर यांनी खेळली असून दोन्हीही विजयी उमेदवार रुकसाना बी अहमद खान व शेख कलीम शेख चांद यांचे प्रत्यक्ष मतदारांपर्यंत भेट देण्यावर जोर होता हे त्यांचे विजयाचे गुपित म्हणावे लागेल तरी या विजयामुळे विरोधकांना मात्र चांगलेच तोंडघशी पडल्याचे चित्र दिसत आहे.

# मुकादम व चिखलीकर कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते : आ. प्रतापराव पाटील

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३ जानेवारी-**

लोहा कंधार तालुक्यातील ग्रामीण विकासात कंधार व लोहा पंचायत समितीचे सभापती कै व्यंकटराव मुकदम याचे योगदान आहे .माजी नगराध्यक्षा जिजाबाई मुकदम यांच्या काळात शहरात अनेक कामे झाली नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात चांगले कामे होतील असा विश्वास व्यक्त करत मुकदम व चिखलीकर कुटुंबात अनेक पिढ्या पासून कुटुंबिक व जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे

लोह्याच्या थेट जनतेतून निवडून आलेल्या पहिल्या नगराध्यक्षा जिजाबाई मुकदम याच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आ प्रतापराव पाटील चिखलीकर बोलत होते व्यासपीठावर माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे, राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, ॲड मुक्तेश्वर धोंडगे,



नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार, आयोजक माणिकराव मुकदम, सचिन पाटील चिखलीकर , केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार , माजी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, नारायराव चव्हाण, माधवराव चव्हाण, सचीन मुकदम, डॉ दिनेश चव्हाण , प्रा डॉ डी एम पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, सुधाकर पवार नामदेव पाटील पवार आत्माराम मुकदम सतीश मूक्कदम ,शिवराज मुकदम, आप्पाराव पवार, बिपिन मूक्कदम, चव्हाण मुकदम परिवार डॉ संजय गुंडावार, यासह सर्व नगरसेवक उपस्थिती होत.

आ चिखलीकर यांनी मुकदम परिवाराच्या सोबत चिखलीकर कुटुंबाचे अनेक पिढयांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध आहेत नगराध्यक्षा स्व जिजाबाई मुकदम याच्या काळात शहरात अनेक कामे झाली आता उर्वरित कामे होतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी दोन्ही परिवाराच्या नात्यांना उजाळा दिला.यावेळी माणिकराव मुकदम यांनी प्रास्ताविक केले तर नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांनी विचार मांडले कोटलवार परिवाराच्या वतीने आ चिखलीकर याचा सत्कार करण्यात आला आभार बिपीन चव्हाण यांनी केले

# नांदेड दक्षिण मतदार संघात राष्ट्रवादी- शिवसेनेची युती

## आ.हेमंत पाटील व आ.प्रताप पाटील यांची संयुक्त पत्रकार परीषदेत माहिती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

नांदेड महापालिका निवडणुकीची लढाई आता सुरु झाली असतानाच दक्षिण मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटांमध्ये युती झाली असल्याची माहिती आमदार हेमंत पाटील व आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी संयुक्त पत्रकार परीषदेत दिली.

भाजपा इंदोर पॅटर्न नांदेडात राबविण्याचा विश्वास जनतेला देत आहे. परंतु नुकतेच वर्तमानपत्रातील बातमीनुसार त्या दूषित पाण्यामुळे १४ लोकांचे जीव गेले. त्यामुळे हा पॅटर्न वापरून भारतीय जनता पार्टी नांदेडकरांचा जीव घेणार आहे काय असा सवाल उपस्थित करत पक्षापेक्षा नांदेड शहर महत्त्वाचे असून नांदेड शहराला वाचवण्यासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीची युती केली असल्याची माहिती आमदार हेमंत पाटील यांनी दिली. तर भारतीय जनता पार्टी इंदोर पॅटर्न सांगत आहे नागपूर पॅटर्नचे त्यांना वावडे आहे काय असा प्रश्न उपस्थित करत शहरातील आठवडी बाजार, पार्किंग व्यवस्था, रस्ते आदी सर्व प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी व शिवसेना शिंदे गटाची युती करण्यात आली असल्याची माहिती आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली. नांदेड दक्षिण मतदार संघात शिवसेना शिंदे १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस १७ जागेवर निवडणूक लढणार आहे. तर अन्य प्रभागात मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. दरम्यान नांदेड उत्तर मतदारसंघात आमदार बालाजी कल्याणकर यांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला असला तरी शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठी आमदार कल्याणकरांनी आमंत्रण दिल्यास प्रचार देखील करू असाही विश्वास आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे नेते माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आमदार आनंद बोंढारकर, माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, विनय गिरडे, शिवराज घोटाळकर, माधव पावडे, बाळासाहेब रावणगावकर आदींची उपस्थिती होती.

